स्त्री व पुरूष ही संसाराची दोन चाके आहेत, पण भारतीय समाजात स्त्रियांना पुरूषांच्या सावलीत उभे राहावे लागते. स्त्रीचा गौरव केला जातो हे खरे पण सत्य मात्र वेगळेच आहे. स्त्री पूजनीय असतानाही स्त्रीवर अन्याय, अत्याचार होतात. स्त्रीला अनेक क्षेत्रात योग्य अधिकार व मान दिला जात नाही. खरं तर समाजात महिलांना समान अधिकार आहेत, हे ही अनेकांना माहिती नाही. तरीही आज भारतीय स्त्री प्रगती पथाकडे वाटचाल करीत आहे. जसे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, इंदिरा गांधी, प्रतिभाताई पाटील, कल्पना चावला, किरण बेदी, लता मंगेशकर, सिंधूताई सपकाळ, पी.टी. उषा, सानिया मिर्झा, मिताली राज अशा अनेक कर्तृत्ववान स्त्रियांनी विविध क्षेत्रात अनमोल कामगिरी केली आहे. आज बस कंडक्टर पासून ते अंतराळवीर या सर्व क्षेत्रांत महिलांनी आपले अस्तित्व सिध्द केले आहे. स्त्री सर्व क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करत आहे.

**तुझ्या उत्तुंग भरारीपुढे**
**गगनही ठेंगणे भासावे**
**विशाल पंखाखाली**
**विश्व ते सारे वसावे ...**

***

# स्त्री-पुरुष समानता



कु. भारमल धनश्री सोमनाथ
तृतीय वर्ष विज्ञान

**"घरामधल्या घरपणाचा आधार असते नारी**
**सौंदर्यांचा थरार असते नारी**
**ईश्वराची मानवतेला भेट असते नारी**
**जगण्यामधल्या आपुलकीचे बेट असते नारी !"**

आंतरराष्ट्रीय महिला दिन यालाच जागतिक महिला दिन असेही म्हणतात. ८ मार्च रोजी जगभरात हा दिवस साजरा केला जातो. हा दिवस प्रत्येक स्त्रीसाठी अभिमानाचा, सन्मानाचा आणि आनंदाचा दिवस आहे. ८ मार्च १९०८ मध्ये अमेरिकेतील न्यूयॉर्क वस्त्रोद्योगातील हजारो स्त्रियांनी आपल्या मागण्यांसाठी उठाव केला. सन १९१० च्या आंतराष्ट्रीय महिला परिषदेत कलकी झेगटी यांनी ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करावा असा ठराव मांडला आणि तो पास झाला. तेव्हापासून हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

आज प्रत्येक स्त्री पुरूषाच्या खांद्याला खांदा लावून सर्व श्रेत्रात काम करते. असे एकही क्षेत्र नाही जिथे महिलांनी आपली कामगिरी बजावली नाही. स्त्री कुटुंबाचा आधारस्तंभ आहे. आपल्या मुलावर चांगले संस्कार करण्यासाठी स्त्री जीवाचे रान करते, तरीसुध्दा स्त्रियांना समाजात मानाचे स्थान मिळत नाही ही आपल्या सर्वांसाठी दुर्दैवच आहे.

**"ज्याला स्त्री आई म्हणून कळली**
**तो जिजाऊचा शिवबा झाला.**
**ज्याला स्त्री बहीण म्हणून कळली**
**तो मुक्ताईचा ज्ञानदेव झाला.**
**ज्याला स्त्री मैत्रिण म्हणून कळली**
**तो राधेचा श्याम झाला, आणि**
**ज्याला स्त्री पत्नी म्हणून कळली**
**तो सीतेचा राम झाला!"**

स्त्री प्रत्येक कुटुंबाचा एक महत्त्वाचा भाग असते. स्त्री शिवाय कुटुंब पूर्ण होऊ शकत नाही आणि कुटुंबाशिवाय समाज पूर्ण होऊ शकत नाही. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर एक स्त्री ही मुलगी, बहीण, पत्नी, आई, मावशी, आजी अशा अनेक जबाबदाऱ्या पार पाडते. आज स्त्री समाजातील प्रत्येक क्षेत्रात प्रगतीपथावर आहे. ग्रामसेविकेपासून ते देशाच्या राष्ट्रपती पदापर्यंत ती आघाडीवर आहे. एवढेच नव्हे तर शिक्षिका, पोलीस, डॉक्टर, खेळाडू अशा क्षेत्रात महिलांनी मोलाची कामगिरी केली आहे. प्रत्येक यशस्वी पुरूषामागे एक स्त्री असते असे मानले जाते. प्रत्येक संकटात स्त्री संपूर्ण कुटूंबाची ढाल बनते.

सावित्रीबाई फुले, झाशीची राणी लक्ष्मीबाई, कल्पना चावला, मदर तेरेसा, सिंधूताई सपकाळ, प्रतिभाताई पाटील, पी.टी.उषा अशा अनेक स्त्रियांनी आपापल्या क्षेत्रात मोलाची कामगिरी केली आहे. आधुनिक काळात स्त्रिया प्रगतीपथावर असल्या तरीही आजही स्त्रियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

गंभीर नाही तर खंबीर आहे!
आदिशक्ती तू प्रभूची भक्ती तू
झाशीची राणी तू ! मावळ्याची भवानी तू!
प्रयत्नांना लाभलेली उन्नती तू,
आजच्या युगाची प्रगती तू!

ती जन्माला येतानाच घेवून
येते प्रेम आणि माया,
कुठल्याच स्त्रीचा जन्म कधीच
जात नसतो वाया !

कधी मुलगी, कधी पत्नी,
कधी आई होत असते,
सासर माहेर उजळविणारी
स्त्री एक ज्योत असते.

स्त्री म्हणजे एक वाट
अशक्य ते शक्य करून दाखविणारी
अन्यायाला न्याय मिळवून देणारी
अन् स्वसुखाचा त्याग करूनी
दु:खांना कवटाळणारी !

# आजची स्त्री : बदलते स्त्रीजीवन



कु. भडांगे निकिता दिलीप
एम. एस्सी. भाग -१

काही सहस्त्र वर्षांपासून विशेषत: मनुस्मृतीच्या काळापासून स्त्रीवर अनेक बंधने आली होती. 'न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हति।' ही मनु-उक्ती स्त्रीच्या तोंडावर सतत फेकली जाते. चूल आणि मुल हे तिचे कार्यक्षेत्र ठरवून तिला चार भिंतीच्या आत अडकवले आहे. दुबळी, अबला अशी तिची हेटाळणी केली जात असे, तर काही ठिकाणी गृहदेवता, स्वामिनी अशा गोंडस शब्दांच्या साहाय्याने तिला बंधनात टाकले जात असे.

**पूर्वजन्माची पुण्याई आहे,**
**जन्म तो तुझ्या गर्भात घेतला,**
**जग पाहिलं नव्हतं तरी,**
**नऊ महिने श्वास स्वर्गात घेतला,**
**जन्म दिला बाईने,**
**तिलाच म्हणतात आई.**

स्त्रीजीवनात विसाव्या शतकात मोठ्या प्रमाणात बदल झाले. त्याचे मुख्य कारण म्हणजे तिला सापडलेला शिक्षणाचा मार्ग. फुले, आगरकर, कर्वे आणि इतर अनेकांच्या प्रयत्नांतून तिला विद्यालयाची कवाडे उघडी झाली. पाटी पेन्सिल हातात घेतलेल्या स्त्रीने अगदी अल्पकाळात विद्यापीठांच्या अंतिम परीक्षाही पार पाडल्या. आजच्या एकविसाव्या शतकात प्रत्येक क्षेत्रात, प्रत्येक कसोटीत ती पुढे आहे. आजची स्त्री म्हणजे -

**स्त्रीने घेतला प्रगतीचा वसा**
**उमटवेल ती सगळीकडे शिक्षणाचा ठसा,**
**सदृढ आरोग्य ही राष्ट्राची उन्नती**
**तशी साक्षर स्त्री देशाची शक्ती**

आजच्या स्त्रीने एक सत्य जाणले आहे. आता ती कोणावरही अवलंबून राहू इच्छित नाही. ती जास्तीत जास्त स्वावलंबी होऊ इच्छिते .नोकरीबरोबर उद्योग, व्यापार क्षेत्रातही ती आपले कर्तृत्व दाखवत आहे. अगदी घरात राहणार स्त्री पण आपल्या फुरसतीच्या काळात काही ना काही का करून अर्थार्जन करते. एकेकाळी स्वयंपाकाची कामे करणे, मुले सांभाळणे ही कामे कमी प्रतीची मानली जात. पण बदलत्या काळानुसार आज पोळीभाजीचे केंद्र चालवणारी स्त्री स्वयंपाकीण समजली जात नाही, तर उद्योजक मानली जाते आणि पाळणाघर चालवणे ही तर समाजसेवाच समजली जाते. आता ती अबला राहिली नाही,तर तिने आपली क्षमता जाणली आहे. ती सबला आहे सक्षम आहे.

घरात कितीही समृध्दी असली तरी घरात स्त्री नसली तर घरात शांती, सुसंवाद, एकमेकांतील आपलेपणा निर्माण होत नाही. घराला एकत्र ठेवण्याचा

**स्त्री आहे म्हणून, सारे विश्व आहे ...**
**ती आहे म्हणून सारे घर आहे**
**ती आहे म्हणून, सुंदर नाती आहेत ...**
**आणि केवळ ती आहे म्हणून,**
**नात्यांमध्ये प्रेम आहे ...**

ग्रामीण भागात विशेषत: आपल्या सारख्या कृषिप्रधान देशात पुरुषाच्या बरोबरीने स्त्री राबते, कष्ट करते. पुरुषाच्या खांद्याला खांदा लाऊन स्त्री भक्कम उभी आहे. अनेकांच्या प्रयत्नातून हळू हळू ती बंधनातून बाहेर पडत आहे. शिक्षणाची कवाडे खुली झाल्यावर तिने आपल्या प्रगतीचा वारू स्वैर सोडला आहे. जीवनातले कोणतेही क्षेत्र तिला अप्राप्य राहीले नाही. पुरुषांच्या बरोबरीने अगदी रणांगणातही ती आपले शौर्य गाजवत आहे.

कामाच्या पद्धतीप्रमाणे स्त्रीने आपल्या राहणीत, आपल्या पोशाखातही बदल केला आहे. तो बदल आता कोणाला खटकतही नाही. साडीपेक्षा सलवार-कुर्ता किंवा जीन-टॉप हे पे;शाख तिला अधिक सुटसुटीत व सोयीचे वाटतात. आजची स्त्री आपल्या स्वास्थाबद्दल जागरुक आहे. त्यासाठी आपले आरोग्य तंदुरुस्त ठेवण्याकडे तिाा कल असतो. आजच्या छोट्या कुटुंबात मुलगा मुलगी यांच्या संगोपनात भेदभाव केला जात नाही. शहरातील हा आधुनिक विचार हळू हळू खेड्यांपर्यंत झिरपत आहे.

आजकाल समाजात घटस्फोटाचे प्रमाण वाढले असले, तरी अजूनही समाज परित्यक्ता, घटस्फोटिता स्त्रियांकडे थोड्या वेगळ्या नजरेने बघत असतो. तरी देखील स्त्री तिचे काम तिच्या पध्दतीने करत असते. आजची सुशिक्षित स्त्री घरदार सांभाळत स्वत:चे क्षेत्र निर्माण करुन सर्व क्षेत्रात आपले कर्तृत्व गाजवत असते.

८ मार्च हा दिन जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो.

**स्त्रीच्या उत्तुंग भरारी पुढे**
**गगनही ठेंगणे भासावे,**
**तुझ्या विशाल पंखाखाली**
**विश्व हे सारे वसावे,**
**समाजाचे नाकारणे ती**
**नेहमीच सहन करते,**
**वेळोवेळी स्वत:ला मग**
**ती सिध्द करते.... !**

महिलांनी आरोग्यसेवा आणि पुर्नउत्पादक अधिकारांमध्ये महत्वपूर्ण प्रगती केली आहे. बऱ्याच देशांमध्ये आता कायदे आहेत. जे गर्भनिरोधक,गर्भपात आणि इतर आरोग्य सेवांमध्ये महिलांच्या प्रवेशाचे संरक्षण करतात.

**घरामध्ये मुलगा जन्माला यायला भाग्य लागतं**
**आणि मुलगी जन्माला यायला सौभाग्य लागतं!**

आजच्या युगातील स्त्री ही विचारी आहे. ती काळानुरुप बदलू पहात आहे. गेल्या शतकातली स्त्री आणि आजची स्त्री यात खूप फरक आहे. आजच्या स्त्रीचा मार्ग विकासाकडे, प्रगतीकडे आणि वैभवाकडे जातो आहे.

***

**" देवाला कोणताच धर्म नसतो. "**

– महात्मा गांधी

**● संत गाडगेबाबांचे प्रेरणादायी विचार ●**

**१) दु:खाचे डोंगर चढल्याशिवाय सुखाचे किरण दिसत नाहीत.**

**२) माणसाचे खरोखर देव कोण असतील तर ते म्हणजे आई-बाप.**

**३) अडाणी राहू नका, मुलाबाळांना शिकवा.**

**४) दगडधोंड्याची पूजा करण्यात वेळ आणि शक्ती वाया घालवू नका.**

**५) दान घेण्यासाठी हात पसरू नका, दान देण्यासाठी हात पसरा.**

**६) धर्माच्या नावाखाली कोंबड्या, बकऱ्यासारख्या मुक्या प्राण्यांचे बळी देऊ नका.**

**७) सगळे साधू निघून गेले आहेत, आता उरले आहेत ते फक्त चपाती चोर (ढोंगी).**

– संत गाडगे महाराज

# महिला सबलीकरण



कु. घुले अश्विनी पाराजी
एम. एस्सी. भाग -१

**वार नाही तलवार आहे**
**ती शमशेरीची धार आहे**
**स्त्री अबला नाही ती तर**
**धगधगता अंगार आहे.**

आज आहे ८ मार्च ! सर्वप्रथम सर्वांना महिला दिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा!

महिला दिनाची खरी सुरुवात स्त्रियांच्या सामूहिक प्रयत्नांनी अमेरिकेत १९०८ साली झाली. ८ मार्च १९०८ मध्ये न्यूयॉर्कमध्ये कपड्याच्या कारखान्यात काम करत असलेल्या महिलांनी काम जास्त पण मजुरी कमी या कारणाने लढा पुकारला. स्त्रियांनी संघटित होऊन स्वत:चा अधिकार मागण्यासाठी केलेला संघर्ष हा जगातील पहिला संघर्ष मानला जातो. त्यानंतर १९१० साली कलारा झेटगी यांनी सुचविल्याप्रमाणे ८ मार्च या दिवसाला जागतिक महिला दिन म्हणून मान्यता मिळाली.

**नभी झेपावणारी तू पक्षिणी....**
**सक्षम कर्तव्यदक्ष तू गृहिणी...**
**प्रसंगी कडाडणारी तू सौदामिनी..**
**शत्रूस धुळ चारणारी तू रणरागिणी!**

आज महिला प्रत्येक क्षेत्रात काम करतात. नेव्ही, पोलिस, डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षिका, राष्ट्रपती, पंतप्रधान, नर्स इ. अनेक पदावर आत्मविश्वासाने कार्यरत आहेत. महिलांचा सन्मान राखणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

**"ज्याला स्त्री आई म्हणून कळली**
**तो जिजाऊचा शिवबा झाला.**
**ज्याला स्त्री बहीण म्हणून कळली**
**तो मुक्ताईचा ज्ञानदेव झाला.**
**ज्याला स्त्री मैत्रिण म्हणून कळली**
**तो राधेचा श्याम झाला, आणि**
**ज्याला स्त्री पत्नी म्हणून कळली**
**तो सीतेचा राम झाला!"**

प्रत्येक महान व्यक्तीच्या जीवनात आणि यशात स्त्रियांचा सिंहाचा वाटा आहे. अशा या स्त्री शक्तीला माझा मानाचा मुजरा! शिवरायांच्या प्रेरणा असणाऱ्या माता जिजाऊ, स्वातंत्र्याची चेतना देणाऱ्या राणी लक्ष्मीबाई आणि स्त्री शिक्षणासाठी झटणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अशी ही स्त्री शक्ती खूप महान आहे.

**स्त्री म्हणजे वात्सल्य**
**स्त्री म्हणजे मांगल्य**
**स्त्री म्हणजे मातृत्व**
**स्त्री म्हणजे कर्तुत्व**

८ मार्च रोजी सर्व जगभरात महिला दिन साजरा होत आहे. आजचा दिवस प्रत्येक महिलेसाठी सन्मानाचा, अभिमानाचा अन आनंदाचा दिवस आहे. आणि तो असणारच... कारण आज प्रत्येक ठिकाणी कर्तुत्ववान महिलांचे सत्कार होतात. पुरस्कार दिले जातात. असा हा महिला दिन दरवर्षी आनंदात उत्साहात साजरा केला जातो. कोविड -१९ साथीच्या काळात आरोग्यसेवी कामात इनोव्हेटर म्हणून जगभरातील मुली आणि स्त्रियांचे योगदान अधोरेखित करते. महिलांनी कोविड १९ च्या काळात संकटातसुध्दा केलेले कार्य नक्कीच गौरवास्पद आहे. म्हणूनच म्हणावेसे वाटते.

**तुझ्या उत्तुंग शरीरापुढे गगनही ठेंगणे असावे,**
**तुझ्या विशाल पंखाखाली विश्व ते सारे विसावे**

आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याचे सर्वात मोठे उद्दिष्ट्यं म्हणजे महिला आणि पुरूषांमध्ये समानता निर्माण करण्यासाठी जागरूकता आणणे. तसेच महिलांना त्यांच्या हक्काविषयी जागरूक करणे. आज पुरूषांबरोबर स्त्रियादेखील सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावत आहेत. शेवटी एवढेच म्हणेन की

**तुझ्या प्रयत्नांना मिळू दे यशाची सोनेरी किनार**
**लक्ष दिव्यांनी उजळू दे तुझा संसार**
**कर्तुत्व आणि सामर्थ्याची ओढून ये नवी झालर**
**स्त्री शक्तीचा होऊ दे विश्वात पुन्हा जागर!!**

**जय हिंद !!**

***

# पर्यावरण आणि प्रदूषण




कु. जगताप शारदा किसन
एम.एस्सी. भाग १

**पर्यावरण म्हणजे काय ?**

आपल्या सभोवतालची नैसर्गिक परिस्थिती व सांस्कृतिक परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय.

निसर्गाने निर्माण केलेल्या घटकांमध्ये हवा, पाणी, जमीन, वनस्पती, पिके, सूर्यप्रकाश व सर्व प्रकारच्या सजीव घटकांचा समावेश होतो. हे पर्यावरणाचे निसर्गनिर्मित घटक आहेत. सर्व सजीवांमध्ये बुध्दिमान सर्वश्रेष्ठ म्हणून मनुष्य प्राण्याचा उल्लेख केला जातो. मानवाने बुध्दि-कौशल्याच्या बळावर विविध प्रकारचे शोध लावले, संशोधनकार्य केले. यंत्रे, खनिजे शोधली. आपले जीवन सुखकारक होण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे विकास होय. शहरे, खेडी-वसाहती,रस्ते, लोह-जलमार्ग, धरण प्रकल्प, कालवे, मंदिरे, उद्योगधंदे, संशोधन केंद्रे, प्रयोगशाळा, ऐतिहासिक, सांस्कृतिक इमारती, प्राथनास्थळे, माहिती तंत्रज्ञान केंद्रे, व्यापार-बाजारपेठा अशा विविध मानवनिर्मित घटकांना सांस्कृतिक घटक असे म्हणतात. नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांनी मिळून सभोवतालची परिस्थिती निर्माण होते, त्याला पर्यावरण असे म्हणतात.

मुळचे नैसर्गिक पर्यावरण संतुलित- सर्वांना जगण्यास पोषक आरोग्यदायी, आनंददायी होते. शुध्द हवा, पाणी, नैसर्गिक वनराईने नटलेली भूमी, सागरात व भूमीवर विविध प्रकारच्या जीवांचा मुक्त विहार यांमुळे पर्यावरण प्रसन्न होते.

मानवाने आपल्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी उद्योगधंदे, व्यवसाय-व्यापार वाढविला. कारखानदारीमधून अनेक उत्पादने घेतली. त्यातून केवळ आर्थिक लाभ झाला. संपत्ती मिळविणे हेच ध्येय जेथे ठरविले जाते तेथे कृत्रिम विकास होतो. कारण वाळवंटात सोने किंवा नोटाची बंडले पाण्याची तहान भागवू शकत नाही. म्हणजेच पाणी हा मोलाचा नैसर्गिक घटक सजीवांना आवश्यक असतो. निसर्ग जपला तरच आपण जगू शकू. निसर्गाला जपणे म्हणजे शुध्द हवा-पाणी मिळविणे, जमिनीची धूप थांबविणे, वृक्षांची लागवड व त्यांचे जतन करणे, आरोग्यवर्धक पर्यावरण निर्माण करणे होय.

**प्रदूषण म्हणजे काय ?**

मूळ लॅटिन शब्द “Pollution” म्हणजे अस्वच्छता, घाण करणे होय. त्यातून “Pollution” व मराठीत प्रदूषण हे शब्द आले.

वातावरणातील घटकांचा समतोल बिघडणे, वातावणातील घटकांमध्ये दृश्य स्वरूपात होणारा दुष्परिणाम म्हणजे प्रदूषण होय. व्याख्या :

मानव व प्राण्यांना जगण्यास घातक अशा द्रव्यांची, पदार्थांची निर्मिती केल्याने पर्यावरणाचे संतुलन बिघडणे व त्यापासून आरोग्याला इजा होते त्याला प्रदूषण असे म्हणतात. अशुध्द द्रव्ये, दुर्गंधी, विषारी घटक यांच्यामुळे हवेतील प्राणवायुचे प्रमाण २०.९५ टक्क्यांपेक्षा कमी होते. त्यालाच प्रदूषण असे म्हणतात.

**प्रदूषणाचे प्रकार :**

१) हवाप्रदूषण २) जलप्रदूषण
३) मृदाप्रदूषण ४) ध्वनिप्रदूषण

**हवाप्रदूषण :** पृथ्वीभोवतीच्या वातावरणात हवेचे अनेक घटक उपलब्ध असतात. या घटकांचा सर्व सजीवांना जगण्यासाठी उपयोग होतो. त्या हवेच्या घटकांमध्ये पाण्यांची वाफ, धूलिकण व काही वायू आढळतात. पर्यावरणाला व मानवाला इजा होईल इतकी हवा अस्वच्छ होणे, हवेत विषारी घटक मिसळणे, हवेत दुर्गंधी येणे अशा अनेक बाबींचा मानवी आरोग्यावर हवेचा दुष्पपरिणाम होणे म्हणजे हवेचे प्रदूषण होय.

ज्या प्रमाणात प्राणवायूचे प्रमाण २०.९५ टक्कांपेक्षा कमी होते ती दूषित हवा होय. दूषित हवा आरोग्याला घातक असते. ही हवा दूषित होण्याची कारणे अनेक आहेत १) औद्योगिकरण २) वाहतुकीत वाढ
३) अतिनागरीकरण ४) वनक्षेत्रात घट

**जलप्रदूषण :** आपल्या पृथ्वीवर ७१% भाग सागरजलाने व्यापलेला तर २९% भाग जमिनीने व्यापलेला आहे. पृथ्वीवर ९% पाणी क्षारयुक्त सागरजल, तर केवळ ३% पाणी गोड्या स्वरूपात उपलब्ध आहे.

व्याख्या : ज्या पाण्यात हानिकारक बाह्य पदार्थ मिसळतात ते पाणी विषारी व अपायकारक असते. अशा अस्वच्छ पाण्यास जलप्रदूषण असे म्हणतात.

पाणी प्रदूषित झाले की पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होते. पाणी हा सर्व सजीवांसाठी अत्यंत आवश्यक घटक आहे. पाण्याला आपण जीवन म्हणतो एका माणसाला जगण्यासाठी दररोज कमीत कमी ५ लीटर पाण्याची आवश्यकता असते, गेल्या ३० वर्षात जगात पाण्याचा वापर तिप्पट वाढला आहे.

**मृदा प्रदूषण:** मातीमध्ये विविध प्रकारच्या विषारी रासायनिक द्रव्यांचे आक्रमण होणे म्हणजे मृदा किंवा भूमी प्रदूषण होय. जमिनीवर नैसर्गिक घटक व सांस्कृतिक घटक आढळतात. काही जमीन शेती, वनस्पतीसाठी उपयोगी पडते, तर काही जमिनीवर पावसाअभावी वाळवंटे आहेत, काही भाग डोंगराळ आहे. शेती वनस्पतीच्या दृष्टीने मृदा भूमी महत्वाची असते. या मृदेला आद्रतेचा पुरवठा झाला की ती वनस्पतीच्या वाढीला उपयुक्त बनते. मृदेपासून विटा, मातीची भांडी तयार करतात. इमारतीसाठी मातीचा उपयोग होतो.

**ध्वनीप्रदूषण :** जे ध्वनी किंवा आवाज ऐकून आपल्याला त्रास होतो त्याला गोंगाट म्हणतात. तो आवाज ऐकायला नकोसा असतो. तीव्र ध्वनी म्हणजे मोठा आवाज सहन न होणारा कर्कश गोंगाट, मोठा आवाज हा यातनादायक, दु:खदायक, मानसिक शांतता व एकाग्रता नष्ट करणारा अस्वच्छता व मानसिक ताण वाढवणारा असतो. कर्कश आवाज ऐकल्याने बहिरेपणा येतो. रक्तदाब वाढतो. हृदयाचे ठोके वाढतात. चिडचिडपणा, रागीटपणा वाढतो यालाच ध्वनिप्रदूषण म्हणतात.

जे ध्वनी ऐकायला मधूर वाटतात अशा शांत ध्वनीमुळे मनाची एकाग्रता व प्रसन्नता वाढते. मधूर संगीत श्रवणामुळे गायी जास्त दूध देतात. पक्षी, प्राणी यांची उत्पादनक्षमता वाढते.

**✻ प्रदूषण टाळण्यासाठी सोपे उपाय :**

१) ध्वनी प्रदूषण बंद करा.
२) आपल्या टीव्ही, संगीत प्रणालीचा आवाज कमी ठेवा.
३) गरज नसताना गाडीचा हॉर्न वाजवू नका.
४) लाऊडस्पिकरच्या वापरातून इतरांना परावृत्त करा.
५) लग्न सभारंभामध्ये बँड, फटाक्यांचा वापर टाळा.
६) ध्वनी प्रदूषण संबंधित सर्व कायद्यांची माहिती करून घ्या.

**✻ हवा प्रदूषण टाळण्यासाठी हे करा :**

१) घरे, कारखाने, वाहने इ. तून होणाऱ्या धुराचे उत्सर्जन कमीत कमी ठेवा.
२) फटाक्यांचा वापर टाळा.
३) कचरा कचराकुंडीत टाका, जाळून त्याची विल्हेवाट लावू नका.
४) थुंकण्यासाठी भांडे किंवा वाहत्या गटारींचा वापर करा.
५) हवेच्या प्रदूषण संबंधित कायदे व नियमाची माहिती करून घ्या व त्यांचे पालन करा.

**✻ जल प्रदूषण टाळण्यासाठी हे करा :**

१) विहिरी, तलाव आणि सार्वजनिक नळ योजनेजवळ कचरा टाकू नका.
२) पाण्याच्या पाईपजवळ भाड्यांना कल्हई करू नका.
३) निर्माल्य, पवित्र मूर्ती, प्लास्टिक, कचरा नदी, तलाव वा धरणात टाकू नका.

**✻ रासयनिक प्रदूषण थांबवण्यासाठी हे करा :**

१) पॉलिथिनच्या पिशव्यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावा.
२) अधिकाधिक वृक्ष लावा व त्यांची जोपासना करा.
३) रासायनिक प्रदूषणसंबंधी सर्व कायदे माहीत करून घ्या व त्यांचे पालन करा.

✻✻✻

# राणी दुर्गावती



कु. आवारी मेघा कांतीलाल
प्रथम वर्ष विज्ञान

राणी दुर्गावती यांचा जन्म ५ ऑक्टोबर १५२४ रोजी राजा चंडेल सम्राट किरत राय यांच्या कुटुंबात झाला. कालंजर किल्ला (बांदा, उत्तर-प्रदेश-भारत) हे त्यांचे जन्मस्थान होय. महंमद गझनी याला पळता भुई थोडी करणाऱ्या राणा विद्याधर यांचा बचाव करण्यामुळे चंदेल राजघराणे इतिहासात प्रसिध्द आहे. राणा विद्याघर यांच्या शिल्पकलेवरील-प्रेमाची प्रचिती जगप्रसिध्द खजुराहो मंदिर व कालंजर किल्याकडे पाहून येते. राणी दुर्गावती यांच्या पराक्रमांमुळे त्यांच्या वंशपरंपरागत धैर्य व कलासक्तीच्या परंपरेला आणखी प्रतिष्ठा लाभली.

इ.स.१५४२ साली राणी दुर्गावती यांचा विवाह गोंड राजघराण्यातील राजा संग्राम शाह यांचे सुपुत्र दलपत शाहा यांच्या सोबत बऱ्याच संघर्षानंतर झाला. या विवाहामुळे चंडेल व गोंड राजघराणी एकत्र आली. याच कारणामुळे शेरशाह सुरीचा पाडाव करते समयी राणा किरत सिंह यांना आपले जावई दलपत शाह यांच्याकडून मदत मिळाली.

इ.स.१५४५ साली राणी दुर्गावती यांनी एका मुलास जन्म दिला. त्यांनी मुलाचे नाव वीर नारायण ठेवले. इ.स.१५५० च्या सुमारास दलपत शाह यांचे निधन झाले. वीर नारायण त्या वेळेस वयाने खुपच लहान असल्याने गोंड राज्याची सूत्रे राणी दुर्गावतींनी आपल्या हाती घेतली. दिवाण किंवा प्रधानमंत्री व मंत्री मान ठाकूर यांनी राणी दुर्गावती यांना यशस्वी व प्रभावी राज्यकारणासाठी मदत केली. नंतर राणीने आपली राजधानी सिंगौर गडावरून हलवून चौरंग गडावर नेली. सातपुडा पर्वतरांगांमधील या किल्ल्याला त्याकाळात खूपच राजकीय महत्व होते. दुर्गावतीने सुमारे १६ वर्षे ज्या कुशलतेने राज्य कारभार सांभाळला त्याचे वर्णन अनेक इतिहासकारांनी आपल्या लेखणीतून लिहून ठेवला आहे. अबुल फजल आपल्या आईना-ए-अकबरी या पुस्तकात लिहितात, दुर्गावतीच्या काळात गोंडवाना इतका सुरक्षित व समृध्द होता, की जनता हत्तीवरून सुवर्ण मुद्रांनी कर भरत असे. मंडला येथे दुर्गावतीच्या ताफ्यात १४०० हत्ती होते.

शेर शाहच्या मृत्यूनंतर सुजात खान याने माळवा प्रांतावर कब्वा केला. त्याच्यानंतर इ.स.१५५६ मध्ये त्याचा मुलगा बाज बहादूर गादीवर आला. राज्यकारभाराची धुरा सांभाळताच त्याने राणी दुर्गावतीवर हल्ला केला. पण या युध्दात त्याचा दारून पराभव झाला. या पराभवानंतर बाज बहादुरला गप्प बसण्याशिवाय पर्याय उरला नाही व राणी दुर्गावतीचे नाव अतिशय प्रसिध्द झाले.

इ.स.१५६२ मध्ये अकबराने माळवा प्रांताचा राजा बाज बहादूर याचा पराभव केला. त्याच्या नंतर माळवा प्रांत मुघल साम्राज्याखाली आणला. यामुळे आपसूकच राणी दुर्गावतीच्या साम्राज्याची हद्द मुघल साम्राज्याच्या हद्दीला स्पर्श करू लागली. यातून दोन राजघराण्यातील संघर्षाची चिन्हे दिसू लागली.

रेवा साम्राज्याच्या रामचंद्र राजाचा पराभव करणारा राणीचा एक समकालिन मुघल सेनापती, ख्वाजा अब्दुल माजिद असफखान हा अतिशय महत्वाकांक्षी मनुष्य होता. राणीच्या साम्राज्यातील समृध्दीने हा प्रदेश आपल्या अंकित करण्याची त्याची लालसा बळावली आणि अकबर राजाच्या परवानगीने त्याने राणीच्या राज्यावर हल्ला केला. राणीला जेव्हा असफ खानच्या आक्रमणाविषयी कळलं, तेव्हा त्यांचे दिवाण ब्योहार आधार सिंह यांनी मुघल सैन्य बलाविषयी पूर्ण कल्पना दिली मात्र राणीने आपल्या सर्वशक्तिनीशी असफ खानला तोंड दयायचं ठरवलं. अपमानित जगण्यापेक्षा सन्मानाने मृत्यूला कवटाळणं तिला जास्त पसंत होतं.

बचावात्मक लढा देता यावा म्हणून त्या नराईला गेल्या. या प्रदेशाच्या एका बाजूस गौर व नर्मदा नदी आणि एका बाजुस पर्वतांची रांग होती. हे एक असमान युध्द होतं. एका बाजूला आधुनिक शस्त्रास्त्रे चालविण्याचे प्रशिक्षण घेतलेल्या सैनिकांचे अफाट सैन्यदळ व दुसऱ्या

बाजुला जुनी हत्यारे चालवणारे अपुरे अप्रशिक्षित सैनिक. राणीचा फौजदार अर्जुनदास युध्दात कामी आला व मग राणीने बचावाच्या लढाईमध्ये आघाडी घेतली. शत्रुच्या सैन्याने घाटात प्रवेश केल्यावर राणीच्या सैन्याने त्यांच्यावर हल्ला चढवला. दोन्ही बाजुला काही सैनिक मेले पण राणीचा या युध्दात विजय झाला. घाटात शिरलेल्या मुघल सैन्याचा तिने पाठलाग केला व ती बाहेर आली.

आता राणीने आपल्या सल्लागारांसोबत युध्दनीतीने चर्चा केली. राणीचं मत होतं की शत्रूवर रात्री हल्ला करावा म्हणजे तो कमजोर पडेल. पण राणीच्या सल्लागारांनी याला नकार दिला. दुसऱ्या दिवसी सकाळी असफ खानने अवाढव्य तोफा युध्दासाठी आणल्या. राणी आपल्या सरमन नावाच्या हत्तीवर स्वार झाली आणि युध्दाला सामोरी गेली. तिचा मुलगा राजपूत वीर नारायण याने देखील या युध्दात भाग घेतला होता. त्याने तीन वेळा मुघल सैन्याची पिछेहाट केली होती. पण ऐन क्षणी तो जखमी झाल्यामुळे एका सुरक्षित स्थळी तो मागे फिरला. या युध्दादरम्यान राणीला देखील बाण थेट त्यांच्या गळ्यात घुसला व त्यांची शुध्द हरपली. शुध्दीवर आल्यावर त्यांच्या लक्षात आलं की या युध्दात पराभव अटळ आहे. त्यांच्या माहुताने त्यांना युध्दभूमिवरून परत फिरण्याचा सल्ला दिला पण राणीने तो मानला नाही. त्यांनी आपला खंजिर काढला व स्वत:चे जीवन संपवले. तो दिवस होता २४ जून १५६४ त्यांचा मृत्यू दिन भारतामध्ये शहीदांचा दिवस म्हणून २४ जूनला साजरा केला जातो. १९८३ साली मध्यप्रदेश सरकारने राणी दुर्गावती यांच्या स्वरणार्थ जबलपूर विद्यापीठाचे नामकरण दुर्गावती विश्वविद्यालय असे केले. २४ जून १९८८ ला त्यांच्या पुण्यतीथीनिमित्त भारत सरकारकडून एक पोस्टाचा स्टॅम्प काढून श्रध्दांजली वाहिली गेली. राणीच्या नावावरून नामकरण झालेली जबलपूर जंक्शन व जम्मूतावी दरम्यान धावणारी ट्रेन दुर्गावती एक्सप्रेस या नावाने प्रसिध्द आहे.

***

**● डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे प्रेरणादायी विचार ●**

**१) तुम्ही किती अंतर चालत गेलात यापेक्षा तुम्ही कोणत्या दिशेने जात आहात, हे अधिक महत्वाचे आहे.**

**२) मी अशा धर्माला मानतो, जो स्वतंत्रता, समानता आणि बंधुता शिकवतो.**

**३) आकाशातील ग्रह, तारे जर माझं भविष्य ठरवत असतील तर माझं मनगट आणि मेंदूचा काय उपयोग?**

**४) स्वत:च्या नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वत:च्या मजबुतीवर विश्वास ठेवा.**

**५) स्वत:ची लायकी विद्यार्थीदशेतच वाढवा.**

– डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# विज्ञानावर बोलू काही ...



प्रा. कु. मोनाली उत्तम पवार
एम. एस्सी. (रसायनशास्त्र) गेट, बी.एड.

मी ॲड्. एम. एन. देशमुख महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी असून आता प्राध्यपिका आहे. मी रसायनशास्त्र विषय शिकविते. मला विज्ञानात फार गमतीजमती वाटतात कारण विज्ञान या विषयात प्रात्यक्षिक करवून प्रगतीपत्रक पाहिले जाते. विज्ञानात मग ते प्रात्यक्षिक प्रदर्शन मेळावे, विज्ञानाचे खेळ अशी अनेक मनोरंजनाची साधने असतील आणि ही साधने खरेतर फार उपयोगी असून आजच्या पिढीला उज्वल भविष्याकडे नेणारी आहेत. तरूण पिढीला विज्ञानाच्या मार्गाकडे नेते म्हणजेच या प्रकारच्या प्रदर्शनामुळे तरूणांच्या मनामध्ये विज्ञानाबद्दल आवड निर्माण होते आणि जर मुलांच्यामध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण झाली तर त्यांना वेगवेगळ्या प्रकारची विज्ञानाविषयी माहिती जाणून घेण्यास आवडते तसेच ते नवीन गोष्टी करण्यास प्रोत्साहित होतात आणि म्हणूनच वेगवेगळ्या प्रकारची प्रदर्शने विज्ञानात महत्वाची ठरतात. हा विषय निवडण्याचे कारण असे की माणसाला असे स्वप्नात देखील वाटेत नसेल की तो पक्षाप्रमाणे आकाशात उडू शकतो, माशाप्रमाणे पाण्यात पोहू शकतो किंवा प्राण्यांच्या बरोबरीने पळू शकतो परंतु हे सर्व शक्य झाले ते विज्ञानामुळेच !

खरेतर विज्ञानाचा जर आपण डोळसपणे आणि योग्य वापर केला तर विज्ञान आपल्यासाठी वरदान आहे. कोणीतरी भोंदू बाबा येतो आणि काहीतरी चमत्कार दाखवून आपल्याला वेडं बनवतो आणि आपण अंधश्रध्देच्या आहारी जातो. विज्ञान दिवस २८ फेब्रुवारी १९२३ रोजी भारतीय भौतिकवादी शास्त्रज्ञ सर चंद्रशेखर वेंकटरामण यांनी रमण परिणामाचा शोध लावला. तेव्हापासून २९ फ्रेबुवारी हा दिवस भारतात राष्ट्रीय दिवस साजरा केला जातो.

सुखामागे धावता धावता
विवेक पडतो गहाण।
पाण्यात राहून भागत
नाही माशाची तहान ।।
विज्ञान हा मानवाला
मिळालेला प्रभावी डोळा आहे,
वापर जो आयुष्यात करत नाही
तो खरोखरच आंधळा आहे.
अंधश्रध्दा, अज्ञानाने झाले वाटोळे ।
दे विज्ञाना सर्व जगाला ज्ञानाचे डोळे।।
आजच्या या विज्ञानी युगात
चला आपण संकल्प करूया
फक्त विज्ञानाचीच कास धरूया ।
विज्ञानाने केली क्रांती, प्रगती
विज्ञानाने दिला एक नवा ध्यास
विज्ञानाने झाला संपूर्ण देशाचा विकास।।
विज्ञानाचे आम्ही वारकरी,
विज्ञानाचे आम्ही सोबती,
विज्ञानाचे आम्ही सांगाती ।
विश्वास ठेवून आम्ही स्वत:वर
विश्वास ठेवू आम्ही स्वडोळ्यावर
विश्वास ठेवू आम्ही विज्ञानावर
येणाऱ्या या पिढीला देऊ
आम्ही विज्ञानाचे ज्ञान हो।
धूळ मेंदूवरची सारून सारी
विज्ञानाचे करतो स्वागत हो।
विज्ञानाची पताका फडकऊ
आम्ही वसुंधरेवरी
विज्ञानावर बोलू काही।
विज्ञानावर बोलू काही।

**विज्ञानाची व्याख्या :**

विज्ञान म्हणजे विशेष ज्ञान. विज्ञान ही ज्ञानाची सुसंबध्द, क्रमबध्द व वैशिष्ठ्यपूर्ण शाखा आहे. विज्ञानाने मनुष्यजीवनासाठी उपयुक्त प्रत्येक सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आणि झोपल्यापासून सकाळी उठेपर्यंत आपण ज्या वस्तूंचा उपयोग करतो, ज्या सुविधांचा उपभोग घेतो ती सर्व विज्ञानाचीच देणगी आहे. मानवाने केलेल्या क्रिया व त्यांचे फलित म्हणजे विज्ञान होय. लॅटिन भाषेतील "Scientia" (सायन्शिया) या शब्दावरून इंग्रजीतील सायन्स हा शब्द तयार झालेला आहे.

**विज्ञानाची साधने :**

वस्तुनिष्ठ निरीक्षणे, प्रयोग, बुध्दिप्रामण्यवाद आणि विश्वासार्ह माहितीची देवाण-घेवाण, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स च्या साह्याने मानवाने कॉम्प्यूटर सिस्टम, रोबोटिक सिस्टमस् तयार केल्या आहेत. मोटार कार्स, एरोप्लेन, बुलेट ट्रेनमध्ये याचा वापर होतो, त्यामुळे प्रवास अधिक जलद झाला आहे. विज्ञानाधारित रेडिओ, टीव्ही, व्हीडिओ गेम्स, मोबाईल, इंटरनेट यांचा उपयोग मनोरंजनासाठी केला जातो.

**विज्ञानाची कार्ये :**

विज्ञानाचे सर्वात प्रमुख कार्य म्हणजे सृष्टीतील संगती जाणणे, तिचे रहस्य उलगडणे हे होय. वस्तुस्थितील सुट्यासुट्या घटकांची माहिती होणे याला फारसे महत्व नाही. महत्व आहे ते या घटकांतील परस्पर संबंधाविषयीचे नियम सापडण्याला. असे नियम सापडणे म्हणजे सृष्टीतील घटकांचा व घटनांचा अर्थ लावणे होय. कोणतीही घटना समजणे म्हणजे ती कोणत्या सृष्टिनियमानुसार होते हे कळणे, काय केले असता काय होईल हे कळले म्हणजे विज्ञानाचे कार्य संपले असे नाही. विज्ञानाचा रोख जे घडले ते कोणत्या सृष्टिनियमानुसार घडते व कसे घडते हे शोधून काढण्यावर असतो. सृष्टीचे रहस्य जाणणे हे विज्ञानाचे ध्येय असते.

विज्ञानाला स्वत:ची अशी परंपरा असते. कोणताही वैज्ञानिक अशा परंपरेतच कार्य करतो. आधीच्या वैज्ञानिकांनी शोधून जतन केलेले सृष्टीचे ज्ञान त्याला पूर्वसंचित म्हणून मिळते व त्यात तो आपल्या शोधाची भर टाकत असतो. अशी एखादी घटना त्याच्या अवलोकनात येते की, जिचा अर्थ उपलब्ध ज्ञानाच्या जोरावर लावता येत नाही. असे झाले की वैज्ञानिक समस्या निर्माण होते. तिच्या दडपणामुळे विज्ञानाची प्रगती होते.

**विज्ञानाची उपयुक्तता :**

विज्ञानाने आंधळ्यांना डोळे, बहिऱ्यांना कान आणि लंगड्यांना चालण्याची शक्ती दिली. विज्ञानाच्या मदतीने मानव चंद्रावर जाऊन पोहोचला. त्याने अवकाशात भ्रमण केले, पृथ्वीला प्रदक्षिणा घातल्या. मानवाने अवकाशात सोडलेले कृत्रिम उपग्रह अवकाशातून आपल्याला सेवा देत आहेत. मानव बह्मांडाची रहस्ये उलगडण्याचा प्रयत्न करीत आहे. संगणक आपल्या जीवनाचे एक अंगच बनला आहे.

सृष्टीतील सर्वश्रेष्ठ प्राणी मनुष्यच आहे. हा आत्मविश्वास विज्ञानाने मनुष्याला दिला. विज्ञानाच्या मदतीमुळेच मानव निर्भयपणे पृथ्वीवर भ्रमण करीत आहे. पूर, वादळ, भूकंप अशा नैसर्गिक संकटांशी लढण्याची शक्ती आज मानवाजवळ आहे. इतिहासात प्रथमच कोणत्याही देशाला गुलाम न करता, जातीय शोषण न करता आजचा मानव आपले राहणीमान उंचावण्यात यशस्वी ठरला आहे.

**विज्ञानाचे फायदे-तोटे :**

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात ज्यामुळे प्रगती झाली ते ज्ञान म्हणजे विज्ञान. विज्ञानाने सर्वांचे आयुष्य सुखकर झाले. विज्ञानाचा सर्वात मोठा शोध म्हणजे वीज होय. विजेचा शोध लागला आणि मानवाच्या प्रगतीच्या सीमा संपल्या. यंत्राचा शोध व विजेचा शोध यामुळे मानवाच्या हाती जणू अल्लाउद्दीनचा दिवा लागला.

सर्व कामे माणूस वीज व यंत्राच्या साह्याने करू लागला. आता तर तो केवळ आज्ञा करतो सर्व यंत्रे त्याची गुलाम होतात. ती सदैव त्याच्या समोर हात जोडून उभी असतात व जणू काही विचारत असतात की, "मेरे आका मेरे लिये क्या हुक्म है?" मनुष्य केवळ एका छोट्या रिमोटच्या बटणाने आज्ञा देतो. कोणतीही कुरबुर न करता क्षणाचाही विलंब न लावता, न चुकता, वेळेकाळाची तमा न बाळगता यंत्रे दिलेले काम संपवून टाकतात.

सृष्टीतील सर्व सजीव एकीकडे तर मनुष्य एकीकडे अशी उच्चतम अवस्था त्याने प्राप्त केली. विज्ञानाची किमया योग्य तेव्हाच ठरते जेव्हा ते सर्वांसाठी हितकारक असते. त्याचा उपयोग इतरांना हानी पोहचवण्यासाठी केला तर... तर ते विकृत ठरते. विज्ञानाने शोधून काढलेली विविध घातक शस्त्रे, अणुबॉम्ब जेव्हा विध्वंस करण्यासाठी वापरली जातात तेव्हा विज्ञानाच्या शोधाचा तो उपहास

ठरतो. संपूर्ण मानवता संपुष्टात आणली जाते व मानव हा मानव न राहून तो काळराक्षस ठरतो आणि म्हणूनच विज्ञान ही काळासाठी उपयोग म्हणून पण गरज आणि त्याचा उपयोग करून ते घातक ठरत आहे. कारण मानवच त्याचा दुरूपयोग करत आहे.

**विज्ञानाची वैशिष्ट्ये :**

वस्तुनिष्ठ सत्याचा शोध व विज्ञानाचा उगम मानवी जिज्ञासेतून झाला आहे. ज्ञानासंबंधीचे विशुध्द प्रेम ही विज्ञानाची प्रेरणा आहे. वस्तुनिष्ठ सत्याचा शोध घेणे हे विज्ञानाचे एक महत्वाचे वैशिष्ट्ये मानले जाते. विज्ञान हे सत्यसंशोधनासाठी प्रयत्नशील असते, परंतु वैज्ञानिक सत्य हे विशेष स्वरूपाचे असते. विज्ञानाला अभीप्रेत असलेले सत्य हे वास्तवतेवर आधारीत असते. एखादी व्यक्ती कितीही महान असली, धर्म, राजकारण, तत्वज्ञान इत्यादी क्षेत्रांतील तिचा अधिकार कितीही मोठा असला तरी त्या व्यक्तीला प्रत्ययाला आलेल्या वस्तुस्थितीच्या घटकांचे वर्गीकरण व विश्लेषण करणे, त्यातील परस्परसंबंधांचे सार्वत्रिक नियम शोधणे, अशा नियमांच्या साहाय्याने अमुक घटना निश्चित अमुक वेळी होणारच असे वर्तविणे, या अज्ञानापासून मानवी जीवनाच्या साफल्यासाठी उपयोगी ठरेल.

विज्ञानाची शक्ती भूगर्भातून पाणी वर ओढून काढते, मरूस्थळे, मरूद्यानात परिवर्तीत होतात. रासायनिक खतांच्या वापरामुळे अन्नधान्याचे उत्पादन वाढले. औषधांमुळे मनुष्य दीर्घायुषी बनला व रोगांपासून त्याचे रक्षण झाले. देवी, प्लेगसारखे साथीचे रोग नियंत्रित झाले. याचे श्रेय विज्ञानालाच आहे.

विज्ञानाने मानवाची चिंतनप्रवृत्तीसुध्दा बदलली, आपल्या समाजाचे स्वरूप बदलले. शहरीकरणाची प्रवृत्ती वाढली आणि राज्ये अधिक शक्तिशाली बनली व मोठी झाली. आजचा मानव जीवनाचा पूर्ण आनंद लुटीत आहे. ज्याप्रमाणे फुलांबरोबर काटे असतात त्याचप्रमाणे विज्ञानाची दुसरी बाजू आहे. विज्ञानाने पृथ्वीला स्वर्ग बनविण्यात कोणतीही कसर सोडली नाही. त्याच विज्ञानाने मानवासाठी नरकाची दारे पण उघडली.

शल्यचिकित्सेने तर इतकी प्रगती केली आहे की मोडलेली हातापायाची बोटे, हाडे जोडली जाताना आपल्याला दिसत आहे, तर किडनी आणि हृदयाचे प्रत्यारोपणसुध्दा करता येते, प्लॅस्टिक सर्जरीमुळे कुरूप व्यक्ती सुंदर होते. स्त्रियांची वांझपणाची समस्या टेस्टट्युब बेबीने दूर केली आहे व त्यांच्या जीवनात माधुर्य आणले आहे.

※ विज्ञान शिकता शिकता विज्ञान जगता आले पाहिजे. शिकलेले विज्ञान जगणे म्हणजे खरे विज्ञान होय!

※ विज्ञानाच्या नवीन तंत्राने आता काही तासांचे काम मिनिटांत करण्यास मदत केली आहे. आज आपले सामाजिक आणि आर्थिक वातावरण विज्ञानामुळे पूर्णपणे बदलले आहे!

※ आस्था आणि अंधश्रेध्देच्या विषायावर विज्ञान हा एकमेव उतारा आहे!

※ जीवनाचे प्रयोग हे प्रयोगासारखे असतात, जिंकण्याच्या वेळेचा वापर कराल आणि तुम्हाला पूर्वीपेक्षा चांगले यश मिळेल!

※ विज्ञानातून समाजात सकारात्मक बदल घडू शकतात. त्यामुळे विज्ञानाचा वापर मानवकल्याणासाठी व्हावा हा मूळ उद्देश समाजात रुजायला हवा. त्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्नशील राहण्याचा संकल्प करूया!

※ विज्ञानाच्या चष्म्यातून जग पाहू, देशाला प्रगतीच्या शिखरावर नेऊ!

※ ज्ञान आणि तंत्रज्ञान प्राचीन काळापासून ज्ञानात समृध्द असलेला आपला देश आज विज्ञान आणि तंत्रज्ञानात नवनवी क्षेत्र पादाकांत करतो आहे !

※ अज्ञान, अंधश्रध्दा, दारिद्र्यं, निरक्षरता यांच्यात अडकलेल्या भारतीय समाजाला विज्ञानाभिमुख करण्यासाठी व मानव कल्याणासाठी व्हावा हा मूळ उद्देश समाजात रुजायला हवा. त्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्नशील राहण्याचा संकल्प करूया!

※※※

# अबला न मी सबला




**कु. ऋतुजा देवराम साबळे**

प्रथम वर्ष विज्ञान

एकविसावे शतक आले म्हणता म्हणता त्यातली बरीच वर्षे संपलीही. अजून आपण स्त्री-पुरूष समानतेच्या गप्पाच मारतोय. ज्या काही समानतेच्या चर्चा, परिसंवाद, भाषणे करतोय ती फक्त कागदावरच राहिली आहेत. आज सर्व स्तरांवर महिलांचे जीवन अधिकाधिक असुरक्षित होत चालले आहे. असुरक्षित जीवन जगणाऱ्या महिलांच्या यादीत भारत जगात चौथ्या क्रमांकावर आहे. अगदी चार वर्षांपासून ऐंशी वर्षाच्या वृध्द महिलेवरही बलात्कार होत आहेत. घरात, शाळेत, आश्रमामधून मुक्या-बहिऱ्या मुली, नोकरी करणाऱ्या महिला या सर्वांचे लैंगिक शोषण होत आहे. ज्या भारतात स्त्रीला देवीचे रूप मानून पूजा केली जाते, त्याच भारतात स्त्रीचा जन्म होऊ नये म्हणून आईच्या उदरातच तिची जीवनज्योत संपवली जाते, कळी उमलायच्या आतच तिला खुडून टाकले जाते, जीव जन्माला यायच्या अगोदरच तिला मरण दिले जाते.

प्राचीन काळापासून मैत्रेयी, गार्गी, मंदोदरी, सीता या पंडित स्त्रियाच होत्या. एकवचनी, एकबाणी, आदर्श राम जिच्या पोटी जन्मला ती कौसल्याही एक स्त्रीच होती, छत्रपतींना हिंदवी स्वराज्याची प्रेरणा देणारी राजमाता जिजाई, आद्यशिक्षिका सावित्रीबाई फुले, स्त्री-पुरूष समानतेच्या पुरस्कर्त्या ताराबाई शिंदे, अहिल्याबाई होळकर या सगळ्या स्त्रियाच होत्या. प्रत्येक स्त्री-पुरूष आईच्या उदरातूनच जन्माला आले आहेत. या सगळ्या सत्यघटना असून आजच्या काळात स्त्रीभ्रूण हत्या का केली जाते? आपण प्रगत झालो सुधारलो म्हणजे नेमके काय झाले? माणूस माणसाला इतका पारखा का होत आहे? 'यत्र नार्यस्त पुज्यते, रम्यन्ते तत्र देवता' या सुभाषिताचा मथितार्थ आपण विसरलो का?

"The status and social place of women will indicate the country's character."

पुराणाच्या, इतिहासाच्या प्रत्येक पानावर घडलेल्या स्त्री सामर्थ्याच्या कथा साक्ष आहेत. तिची शक्ती, सामर्थ्य अनुसयाचे तप सामर्थ्य, यमधर्मालाही जिंकणारे सावित्रीचे बुद्धिसामर्थ्य, क्षमापुत्री सीतेची सहनशीलता, डोळस अंध म्हणून आपल्या डोळ्यावर पट्टी बांधणाऱ्या गांधारीचे त्यागसामर्थ्य, शतकर्ता निर्माण करणाऱ्या जिजाऊचे प्रेरक सामर्थ्य, हिरकणीची वात्सल्यशक्ती, जनाबाईची भक्तिप्रभाव, झाशीच्या राणीचे समरसामर्थ्य, सुवर्णकन्या पी.टी. उषा ते कृष्णा पाटील यांचे नेतृत्वसामर्थ्य सर्व जगाला विदित आहे. संस्कृतीचा, पुरूषप्रधान वर्चस्वाचा आब राखूनच, नजीकच्या भूतकाळात तर या पुरूषप्रधान संस्कृतीने स्त्रियांचे तेजोवलय झाकोळून टाकले होते. ती क्षणाची पत्नी आणि अनंतकाळाची माता असते अशा उदात्त शब्दांचा मुलामा देऊन, गृहलक्ष्मी या गोंडस नावाखाली तिला उंबरठ्यात कोंडले. 'न स्त्री स्वातंत्र्यमहति..' पुरूषप्रधान संस्कृतीचे पारडे जड होऊन स्त्रीला दुय्यम नव्हे तर नगण्य स्थान दिले.

महिलांच्या वर्चस्वाबद्दल आणि तिच्या महती बद्दल हजारो अनाथ लेकरांची माय झालेल्या सिंधूताई सपकाळ नेहमी आपल्या गप्पाकोष्टकांमधून सांगतात की, बायांनो जगा गं, ठामपणे आत्मविश्वासाने जगा ! तुम्ही जगू शकता जगवू शकता. पुरूष नाही ग बायांनो एकटा जगू शकत. देवानं आपल पारडं त्याबाबतीत भारी ठेवलंय, अशा रडता काय? संकटाच्या छाताडावर पाय रोवून उभ्या राहा. सगळं निभावून नेण्याची ताकत फक्त आणि फक्त तुमच्यांत आहे. संसार म्हणजे दोन चाकी सायकल. पुढचं चाक म्हणचे नवरा अन् मागचं चाक म्हणजे बायको. चैनसकट पँडल कुठं.. मागच्या चाकाला, ब्रेक कुठं.. मागच्या चाकाला, ओझी वाहायचं कॅरिअर कुठं मागच्या चाकाला, कुलूप कुठं..तर ते सुध्दा मागच्या चाकाला, सीट कुठं..मागच्या चाकाला, सायकल स्टॅण्ड कुठं.. मागच्या चाकाला. सगळंच बायकांच्या खाद्यांवर आणि पुरूषाला काय हँडल घुमाओ और घंटी बजाओ, राष्ट्रविकासाची जाणीव निर्माण होऊन एकोणिसाव्या शतकात म.ज्योतीबा फुले, महर्षी कर्वे, भाऊराव पाटील, पंडिता रमाबाई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रीशिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले, त्यांनी अबला असणाऱ्या स्त्रीला सबला बनवले.

***

# आद्य क्रांतिकारक वीर राघोजी भांगरा



कु. योगिता काळू पटेकर
प्रथम वर्ष विज्ञान

**आदिवासींचा अस्तित्वासाठी संघर्ष :**

आदिवासी हे शांतता प्रिय लोक आहेत. वस्ती अथवा शेती करण्यासाठी त्यांनी व्यापलेल्या जमिनीशी असलेली त्यांची बांधिलकी अतुलनीय आहे. त्यांच्या भूप्रदेशावर केलेल्या आक्रमणांचा त्यांनी कडवा प्रतिकार केला आहे. त्यांनी प्रसंगी शोषणकारी वर्गातील सावकार, दलाल, दारूविक्रते, जमीनदार आणि सरकारी प्रशासक विशेषत: वनउत्पादकनशुल्क पोलिस आणि महसुली अधिकाऱ्यांविरूध्द हिंसक निषेध नोंदवला आहे. ब्रिटीशांच्या साम्राज्य विस्तारानंतर आदिवासींनी ब्रिटिश आणि अन्य पिळवणूकदारांविरूद्ध आपल्या अस्तित्व रक्षणासाठी उभारलेल्या अनेक लढ्यांचा लिखित इतिहास उपलब्ध आहे.

इ. स. १९०० च्या सुरूवातीला एकीकडे इंग्रजांची सत्ता वाढत होती तर दुसऱ्या बाजुला इंग्रजांना विरोध होऊ लागला. या निमित्त महाराष्ट्राच्या पुणे, नाशिक आणि ठाणे इत्यादी जिल्ह्यांतील आदिवासी प्रदेशातील महादेव कोळी तसेच भिल्ल समाज संघटित होऊ लागला होता. त्यांनाच या क्षेत्रात इंग्रजांविरूध्द सर्वप्रथम संघर्ष करण्याचा श्रेय मिळते. महाराष्ट्र ही शूर वीरांची भूमी म्हणून ओळखली जाते. आदिवासी समाज हा मुळातच क्रांतिकारक, शूर आणि धाडसी आहे. त्यांनी जुलूम, कारावास, फाशी यांसारख्या शिक्षा भोगल्या, परंतु कधीच झुकले नाहीत. आदिवासी महादेव कोळी समाजातील आद्य क्रांतिकारक वीर राघोजी भांगरा यांचे स्वातंत्र्य लढ्यात महत्वाचे योगदान आहे.

**जन्म :** अकोले तालुक्यातील देवगाव हे दोनशे ते तीनशे लोकांचे गाव. शोण नदीच्या किनाऱ्यावर वसलेल्या महाकाळ डोंगर रांगेतील चोमदेव डोंगराच्या पश्मिमेकडील या गावात ८ नोव्हेंबर १८०५ रोजी रामजी व रमाबाई यांच्या पोटी राघोजी भांगरे यांचा जन्म झाला.

**बालपण व शिक्षण :**

त्या काळातील जव्हारच्या मुकणे संस्थानच्या राजूर प्रांताचे रामजी सुभेदार होते. सुभेदाराच्या घरात थोरल्या मुलीनंतर मुलाचा जन्म झाल्याने सगळीकडे आनंदाचे वातावरण निर्माण झाले. राघोजीवर लहानपणापासूनच चांगले संस्कार झाले. रामजी यांनी राघोजींना घरीच शिकण्याची शिक्षणाची व्यवस्था केली होती. खेळण्याबागडण्याच्या वयात राघोजी तलवारबाजी, भालाफेक, पट्टा चालविणे, बंदुकीने निशाणा साधणे, घोडेस्वारी करणे यात तरबेज झाले. त्यांच्या अंगातील धाडसी गुण लहानपनीच गावकऱ्यांना दिसून येत होते. लहान पणापासूनच राघोजीला व्यायामाची आवड होती. त्यामुळे शरीर सुदृढ होते. विविध प्रकारचे पक्षी व प्राणी या जंगलात वास्तव्य करत होते. एकदा राघोजी शिकारीसाठी आपल्या काही सोबत्यांना घेऊन गेला होता. रानात फिरता-फिरता त्यांना वाघ दिसला. आपल्या बंदुकीचा चाप ओढून राघोजीने गोळी झाडली परंतु त्यांच्या पायांच्या आवाजाने सावध झालेल्या वाघाने ती गोळी चुकवली. ती गोळी वाघाच्या मानेजवळ चाटू गेली. जखमी वाघ चवताळला त्याने परत हल्ला करत राघोजीवर झेप घेतली. अंगावर चालून आलेल्या वाघाला घाबरून न जाता अतिशय सावधरीतीने वाघावर प्रतिहल्ला केला. दोघांमध्ये धरपकड सुरू झाली. काही क्षणात राघोजीने वाघावर आपले वर्चस्व सिध्द करत त्याचा खालचा जबडा एका हाताने धरून फाडला. रक्ताच्या थारोळ्यात वाघ जागेवर पडला. राघोजीच्या धाडसी पराक्रमाचे कौतुक सर्व परिसरातील लोक करू लागले होते.

**इ.स.१८२८ सालचा शेतसारा :**

इ. स.१८२८ साली शेतसारा वाढविण्यात आला. सारा वसुलीमुळे गोर-गरीबांना पैशाची गरज भासू

लागली. त्यामुळे गोरगरीब सावकार–वाण्यांकडून खूप जास्त दराने कर्ज घेऊ लागले. त्यामुळे कर्जाच्या बदल्यात सावकार जमिनी बळकावू लागले. राघोजी भांगरे यांनी सावकार आणि इंग्रजांविरूध्द तीव्र बंड केले. इंग्रज सत्तेच्या विरोधात नगर, पुणे, नाशिक, ठाणे या भागात बंडकऱ्यांनी टोळ्या उभ्या केल्या.

इ. स.१८३० साली अहमदनगर जिल्ह्यामधील अकोले तालुक्यातील रामा किरवा याला पकडून अहमदनगर येथील तुरूंगात फाशी देण्यात आली. अन्यायी, अत्याचारी सरकार, सावकार, जमीनदार यांच्या विरोधात आवाज उठविण्याचे काम राघोजींच्या नेतृत्वाखाली सुरू झाले. त्यांनी कोतुळ, राजूर व खिरविरे परिसरातील जुलमी व अत्याचारी सावकारांवर धाडी टाकल्या, त्यांची संपत्ती लुटून गोरगरिबांना वाटून टाकली, तसेच सावकारांनी कब्जा केलेल्या जमिनींचे सर्व कागद व दस्तऐवज यांची होळी केली.

**१८२१ सालचा उठाव :**

एकीकडे राघोजी भांगरे मोठे होते असताना वेगवेगळे पराक्रम करत होते. तर दुसरीकडे इंग्रज सरकार अकोले तालुक्यातील रतनगड आपल्या ताब्यात आला पाहिजे यासाठी प्रयत्न करत होते. याच रतनगडावर रामजी भांगरे यांच्या नेतृत्वाखाली गोविंदराव खाडे, वालोजी भांगरे, लक्ष्या ठाकर, रामा किरवा यांनी १८२१ साली जाहीर उठाव केला होता. कॅ. Makintos ने या भागातील आदिवासी क्रांतिकारकांचे वर्चस्व संपुष्टात आणण्यासाठी पाच हजारांच्या फौजेसह रतनगडावर चाल केली. त्यावेळी किल्यावर फक्त पाचशे सैनिक होते. चढाई करतांना गडावरून होणारा कडवा विरोध पाहून मदतीला आणखी दोन हजारांची फौज मागवली होती. या लढाईत रामजी भांगरे यांनी आपले ४०० सैनिक गमावत कॅ. Makintos च्या फौजेतील सुमारे साडेतीन हजार सैनिकांचा खात्मा केला होता. प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही रतनगड हातचा गेला. या लढाईत रामजी भांगरा व गोविंद खाडे यांना अटक करण्यात आली. पुढे खटला चालवून रामजी भांगरा यांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली.

वडिलांच्या अनुपस्थितीत राघोजी भांगरे आपल्या गावात पोलिस पाटील या पदाचा कारभार चालवीत होता. गावातील भांडणे मिटविणे, न्याय निवाडा करणे, गावाचा महसूल गोळा करून तो सरकारच्या तिजोरीत जमा करणे अशी कामे तो करत होता. आपल्या वडिलांचे राजूर प्रांताचे पद जाऊन त्यांना काळ्या पाण्याची शिक्षा झाल्याची सल त्यांच्या मनाला सतत बोचत होती. आपल्या चोख कारभारामुळे राजूर पोलीस ठाण्यात राघोजीला इतरांपेक्षा अधिक मान होता. सुमारे एक वर्षापासून रिक्त असलेल्या राजूर प्रांताच्या पोलीस अधिकारी पदासाठी राघोजीने अर्ज केला. या अर्जात त्याने माझ्या वडीलांचे पद मलाल मिळाले पाहिजे अशी आग्रही मागणी केली होती. परंतु सरकारने ही मागणी फेटाळून लावत त्या जागी अमृतराव कुलकर्णी याची नेमणूक केली. या घटनेने राघोजी अधिक दुखावला गेला व त्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांशी त्याचे कधीच पटले नाही. अमृतराव कुलकर्णी यांच्याशी तर त्याचे कधीच पटले नाही.

कोकणामध्ये एक दिवस मोठा दरोडा पडला. या दरोड्यात राघोजी भांगरे यांचा हात असल्याचा खोटा अभिप्राय अमृतराव कुलकर्णी यांनी सरकारला पाठवला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पुरता तपास न करता राघोजीला तातडीने अटक करण्याचा आदेश दिला. त्या आदेशानुसार अमृतराव कुलकर्णी यांनी आपल्या हवालदारास राघोजीला नोटीस बजावण्यास सांगितले. आपल्यावरील खोट्या आरोपाची माहिती राघोजीच्या कानवर पडताच त्याच्या तळपायाची आग मस्तकात गेली. राघोजीच्या मनातील घालमेल ओळखून देवजी नाना यांनी त्यास पोलिसांवर विश्वास न ठेवण्याचा सल्ला दिला. या दगाबाज इंग्रज सरकारला धडा शिकवायचा असा बेत मनात आखून राघोजी दुसऱ्या दिवसी राजूर पोलीस स्टेशनला हजर झाला. आपल्यावरील खोट्या आरोपाचा जाब विचारायला लागल्यावर पोलीस अधिकारी राघोजीला कायद्याची भीती दाखवू लागले. या दरम्यान राघोजी व अमृतराव कुलकर्णी यांच्यांत बाचाबाची झाली. याचे रूपांतर शेवटी झटापटीत झाले. वाघाशी दोन करणारा राघोजी पुरता पेटून उठला. त्याने एका

झटक्यात साहेबाचं नरडं दाबून त्याला मारून टाकलं. राघोजीचा असा अवतार पाहून बाकीचे हवालदार कधीच पळून गेले होते. परत फिरताना राघोजीने पोलीस स्टेशनमधील सात रायफली व काडतुसांची पेटी हातात घेतली. इंग्रजांनी केलेल्या अन्यायाविरोधात लढण्यासाठी राघोजी सज्ज झाला होता. तेथून पुढचा प्रवास अधिक संघर्षमय असेल याची जाणीव त्याला झाल्याने त्याने आईचा आशीर्वाद घेऊन घर सोडले व बाडगीच्या घनदाट जंगलाचा रस्ता धरला. यावेळी त्याच्यासोबत तरणाबांड तुफान ताकतीचा नेमबाजीत पटाईत असलेला शूर लढवय्या राया ठाकर होता. तसेच देवजी आव्हाड यांचे मोलाचे मार्गदर्शनही लाभत होते.

राघोजी भांगरे याचे संघटन कौशल्य खूपच चांगले व त्याच्या कार्याची जाणीव सर्वांना असल्याने आठ दिवसात मुळा खोरे, चाळीसगांव डांगण म्हणजे प्रवरा खोरे, बारागाव पठार म्हणजे प्रवरा खोरे या परिसरातून विविध जाती जमातीचे अनेक तरूण त्यांना येऊन मिळाले, अन्यायी अत्याचारी सरकार, सावकार, जमीनदार यांच्या विरोधात आवाज उठविण्याचे काम राघोजीच्या नेतृत्वाखाली सर्वजण करू लागले. जंगलात राहून वेळ प्रसंगी भाजी-भाकरी चटणी खाऊन तर कधी उपाशी पोटी जनसंपर्क करत होते. सरकारवर विसंबून राहू नका, सावकारला कोणताही कर भरू नका.. तुमचा कर राघोजीला द्या.. तो तुम्हाला मदत करील असे आवाहन सगळीकडे करण्यात येऊ लागले. अगोदरच सावकारांच्या जाचाला व इंग्रजांच्या अन्यायी धोरणाला वैतागलेले सामान्य लोक न्याय मागण्यासाठी राघोजीकडे येऊ लागले. अशा प्रकारे महाकाळ डोंगरावर बंडाचं पहिलं निशाण फडकविण्यात आले.

**रमायाबाई म्हणे राघू माझा गं लहान**
**मावळ मुलुखाचा राजा होईल महान!**
**रमायाबाई म्हणे राघू माझा गं बलदंड**
**जुलमी सावकाराविरोधी हा पुकारील बंड!!**

आपल्या प्रत्यक्ष कार्यातून सार्थकी ठरवू लागला होता. राघोजीनं काही महिन्यांच्या कालावधीत परिसरातील सर्व जुलमी व अत्याचारी सावकारांवर धाडी टाकल्या व त्यांची धनसंपदा लुटून गोर-गरीबांना वाटून टाकली. तसेच सावकारांनी कब्जा केलेल्या जमिनींचे कागदपत्र व दस्तऐवज यांची होळी केली. आया-बहिणींच्या वर हात टाकणाऱ्या सावकारांचे कान-नाक कापले. हजारो-लाखों एकर जमीनी सामान्य लोकांना परत मिळवून देण्याचे काम राघोजीने केल्याने सावकार व इंग्रजांवर त्याची दहशत बसली होती.

अकोले तालुक्यातील पाभुळवंडी, लाडगाव, आंबेवंगण ही चारही गावं ललुभाई या सावकाराकडे होती. वसुलीसाठी हा सावकार या परिसरातील आदिवासी बांधवांची पिळवणूक करत असे. सर्वांच्या जमिनी त्याच्या ताब्यात असल्याने कोणी त्याच्या अन्यायाविरोधात बोलत नव्हते, याची जाणीव राघोजीला अगोदरच होती. देवजी आव्हाड यांच्या सेल्ल्यानुसार ललूभाईवर धाड टाकण्याचे नियोजन करण्यात आले. रात्री सगळीकडे शांतता पसरल्यावर त्याच्या घरावर हल्ला करण्यात आला. ललूभाईकडून तिजोरीच्या चाव्या हिसकाऊन घेऊन त्यातील पैसे व दागिन्यांच्या दोन गोण्या भरल्या. शेतीच्या कागदपत्रांचा शोध घेऊन त्यावर तेल ओतून पेटवून दिले. अशा प्रकारे सावकारशाही विरोधातील पहिले पाऊल राघोजीने आपल्या साथीदारांच्या मदतीने अचूक टाकले होते.

बारागांव पठार म्हणजेच प्रवरा खोऱ्यात अमरचंद, हुकुमचंद, केशवचंद या सावकारांनी लोकांच्या जमिनी गिळकृत केल्या होत्या. या सर्व सावकारांचे खिरविरे हे मुख्यालय होते. परिसरातील आदिवासी बांधव उपाशी मरत असताना सावकार मात्र आपले दडपशाहीचे धोरण राबवत होते. प्रसंगी आया-बहिणींवर हात टाकत होते. तिघेही सावकार अतिशय उर्मट होते. त्यांच्याकडे स्वसंरणासाठी बंदुकधारी अंगरक्षक होते. राघोजीला लोकांचे हाल पाहावत नव्हते. यांनाही धडा शिकवून लोकांना जाचातून मुक्त करण्याचा विडा रोघोजीने उचलला. साठ सहकाऱ्यांच्या तीन टोळ्या करून एकाच वेळी सावकारांवर हल्ले करण्यात आले. तीनही सावकारांच्या तिजोऱ्या रिकाम्या केल्या व त्यांची नाके कापून सर्वजण बाडगीच्या माचीकडे पसार झाले.

**बाडगीची माची :**

बाडगीची माची हे क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या इतिहासातील खूप महत्वाचं ठिकाण आहे. राघोजीने आपल्या बंडाला याच ठिकाणाहून सुरूवात केली असे म्हटले जाते.

स्वातंत्र्यपूर्व काळात राजूर ही एक मोठी बाजारपेठ होती. या एकाच पेठेत अनेक सावकार, जमीनदार राहत होते. त्यामुळे बाहेरून येणारे व्यापारीही मोठ्या प्रमाणात राजूरच्या पेठेला भेट देत असत. राजूरच्या चारही बाजूंचा परिसर बघितला तर मोठ्या प्रमाणात आदिवासी शेतकरी बांधवांचे वास्तव्य होते. अधिक नफा कमवायच्या हेतूने सावकार व जमीनदार या सर्व लोकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक करत होते. एकदा काढलेले कर्ज कधीही फिटत नसे. अशा प्रकारची अव्वाच्या सव्वा व्याज आकारणी हे सर्व करत होते. दिलेल्या कर्जाच्या बदल्यात जमिनी मात्र आपल्या नावावर करून घेण्याचा धडाका त्यांनी लावला होता. ज्याच्या जमिनी सावकार ताब्यात घेत त्यांनाच कसायाला देत असत. सामान्य शेतकरी जमीन कसून उत्पन्न काढत असे व सावकार सर्व पिकलेलं धान्य वाहून नेत असत. रक्ताचं पाणी करूनही हातात काहीच पडत नसल्याने अनेकांची उपासमार होत असे. या दुष्टचक्रातून शेतकऱ्यांना व आदिवासींना बाहेर काढण्यासाठी काही करावे असा विचार राघोजीच्या मनात आला. परंतु राजूरभागातील सावकारांना सरकारचे संरक्षण असल्याने त्यांची सावकारशाही संपुष्टात आणणे इतके सोपे काम नव्हते. राघोजीने पूर्ण नियोजन करून एक दिवस राजूर बाजारपेठेवर धाड टाकली. या धाडीत राघोजीने सावकारशाहीला चांगलाच धडा दिला व प्रचंड लुटही आपल्या ताब्यात घेतली. त्यानंतर लागलीच जवळच्या असलेल्या कोतूळ येथील बाजारपेठेवरही हल्ला करून तेथील सावकारांच्या त्रासापासून लोकांची सुटका केली. राघोजी भांगरे यांच्या वाढत्या दबदब्यामुळे या भागातील सावकार व जमीनदार आपले सर्व अधिकार सोडून अकोले व संगमनेर परिसरात पळून गेले.

**अलंग व कुलंग गडावरील लढा :**

राघोजी भांगरे यांचा सावकारशाही विरोधातील हा लढा अधिकाधिक व्यापक स्वरूप घेत असताना त्यांना नाशिक, ठाणे, पुणे या भागातूनही निरोप येऊ लागले होते. हे सर्व करत असताना धोकेही वाढत होते याची जाणीव राघोजीला झाली होती. तसेच आपले संघटन अधिक सक्षम व मोठे करण्याचे आवाहनही त्याच्यासमोर होते. एकीकडे संघटन वाढवत दुसरीकडे इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, सुरगाणा पेठ, कळवण या भागातील सावकारशाहीचा बिमोड केला. यानंतर राघोजीने बाडगीच्या माचीमध्ये असलेले आपले निवासस्थान अलंग व कुलंग या दुर्गांवर हलविले.

इंग्रज आपली सत्ता सावकार व जमीनदार यांच्या मदतीने वाढवत असत. परंतु राघोजी भांगरे याने सावकारशाहीवर आपला विजय मिळविण्याचा धडाका लावल्यामुळे त्यांचा इंग्रजावर मोठा परिणाम होऊ लागला होता. या प्रकाराने इंग्रज अधिकारी चांगलेच हादरले होते. राघोजीचा सामान्य जनतेला पाठिंबा असल्याने सर्वसामान्य माणूस इंग्रज सत्तेविरोधात बोलण्याचे धाडस करू लागला होता. नेमके हेच इंग्रज सरकारला नको होते. राघोजीचा वेळीच बंदोबस्त केला नाही, तर आपली या भागातील सत्ता जाईल या भीतीने २०० शिपायांची तुकडी घेऊन कॅ. थॉमस यास जबाबदारी नेमून दिली.

कॅ. थॉमस यांस त्यांच्या गुप्तहेरांनी खबर दिली की राघोजी सध्या कुलंग गडावर वास्तव्यास आहे. त्यानुसार घनदाट जंगलातून वाट काढत अलंग गडाच्या माचीतून कॅ. थॉमस आपल्या शिपायांसह आगेकूच करू लागला. तिकडे राघोजीला याची खबर अगोदरच तिकडे राघोजीला याची खबर अगोदरच मिळाल्याने त्याने कॅ. थॉमस चा बदोबस्त करण्यासाठी पूर्ण नियोजन केले होते. कॅप्टनने अलंगगडाच्या माचीचे घनदाट जंगल ओलांडून पुढे जायला सुरूवात करताच पाठीमागून बापू भांगरे यांनी आपल्या साथीदारांसह जोरदार हल्ला केला. अचानक झालेल्या हल्ल्याने व खूप अंतर पायी चालल्याने परतीचा हल्ला करण्याची क्षमता कॅप्टनच्या शिपायांत उरली नव्हती

नव्हती. तिकडे देवजी आव्हाड यांनीही दुसरीकडून हल्ला चढवला होता 'पळा-पळा' , कॅप्टनचे शिपाई वाट दिसेल तिकडे पळू लागले. पुढे झाडीतून लपून बसलेल्या देवजी आव्हाड यांच्या साथीदारांनी एका एका सैनिकाचे मुंडके उडविण्याचे काम केले. धरमा मुंढे, खंडू साबळे हे सुध्दा आता समोरून तुटून पडले होते. कॅप्टन वेड्यागत चौफेर फायरिंग करत परतीच्या वाटेने खाली उतरण्यासाठी पळत होता. या धावपळीत झाडांमधून आलेली एक गोळी कॅप्टनच्या डाव्या मांडीला चाटून गेली होती. यामुळे कॅप्टनने आपला जीव वाचविण्यासाठी लपत छपत मागे फिरला. तो मिळेल त्या वाटेने थेट काळुस्ते या गावात उतरला. या धुमश्चक्रीत राघोजीच्या मावळ्यानी एकशे शहाण्णव शिपायांची कत्तल केली होती. या लढाईत राघोजीला मोठ्या प्रमाणात काडतुसे हाती लागली होती. इंग्रज सरकार राघोजीच्या या कृत्याने प्रचंड हादरले होते. राघोजीचे बंड मोडीत काढण्यासाठी अनेक इंग्रज अधिकारी नवे नवे बेत आखत होते. परंतु कोणालाच यश मिळत नव्हते.

**नाशिक विभागाची मोहिम :**

सामान्य लोकांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याचे काम राघोजी भांगरे करू लागल्यामुळे त्याच्या विषयी कोणीही सरकारला माहिती देत नव्हते. राघोजीने नाशिक परिसरातही आपली सावकारांविरोधातील मोहिम सुरू ठेवली होती. नाशिक परिसरातील त्यांच्या बंडांचे वर्णन पुढील ओव्यांतून आपल्याला दिसून येईल.

झाडामधी झाड, उंच पांगाऱ्याचा
राघूनं केलं बंड गाव सांगे भांगऱ्याचा
गं ऐक गौराबाई ।।धृ।।

राघूनं केलं बंड नितरोज हरघडी
कत्तल केली पोलिसांची मुंड्या लावल्या हो झाडो-झाडी.
राघूनं केलं बंड कुलंग गडाच्या माळीला
गोऱ्या साहेबांच्या टोप्या ह्या गुंतल्या जाळीला
गं ऐक गौराबाई ।।१।।

राघूनं केलं बंड, बंड घोटी खंबाळ्याला
धरणी काय आली कोंभाळण्याच्या बांबळ्याला
राघूनं केलं बंड तीरंगळ गडाला
यानं हादरा बसविला इगतपुरी या पेठाला
गं ऐक गौराबाई।।२।।

राघूनं केलं बंड,बंड टाके देवगावाला
वैरी त्रिंबक कांदडी यमसदनी धाडीला
राघूनं केलं बंड अंजनेरी या गडाला
बसविला यानं हादरा गाव तिरमक पेठाला
गं ऐक गौराबाई ।।३।।

राघूनं केलं बंड, बंड सुरगाणा पेठाला
कापली नाकं, लुटलं सावकारशाहीला,
राघूनं केलं बंड, बंड पेठ तालुक्याला
कापलीया नाकं, जहू मुलखी गाजला
गं ऐक गौराबाई ।।४।।

राघूनं केलं बंड, बंड सप्तश्रृंगीच्या गडाला
बसविला यानं हादरा दिंडोरीच्या पेठाला
राघूनं केलया बंड, नाशिक हवेली लुटली
काढून लग्नाची वरात, नाकं वाण्यांची कापली
गं ऐक गौराबाई ।।५।।

या गीतातून राघोजी भांगरे यांच्या सावकारशाही विरोधातील नाशिक विभागातील धडक मोहीमेचे वर्णन केले आहे.

राघोजी भांगरे यांच्या कार्याचा प्रभाव वाढत असताना इंग्रज सरकारच्यासमोर त्याला रोखायचे कसे याचे आव्हान उभे राहिले होते. त्यांनी वेगवेगळ्या प्रकारे प्रयत्न केले, प्रसंगी बक्षिसाचे आमिष दाखविले, परंतु कोणीही राघोजीचा ठावठिकाणा सांगण्यास पुढे येत नव्हते. यामुळे सरकारसमोर मोठा पेच निर्माण झाला होता. अनेकदा राघोजीला पकडण्यासाठी इंग्रजांनी तुकड्या पाठवल्या परंतु प्रत्येक वेळी त्यांच्या पदरी अपयश पदरी पडले. यामुळे झालेली नामुष्की पचविणे इंग्रज अधिकाऱ्यांना जड जाऊ लागले. म्हणून त्यांनी राघोजीचा ठावठिकाणा शोधण्यासाठी अत्याचारी पवित्रा

अवलंबिला. त्यांनी राघोजीच्या घरातील लोकांना त्रास द्यायला सुरुवात केली. बायकांच्या वक्षस्थळांना टिपऱ्या लावल्या. राघोजीच्या घरी वारंवार धाडी टाकून काहीही हाती लागत नसल्याने शेवटी त्यांच्या आईला म्हणजे रमाबाईला ताब्यात घेण्यात आले. पोलीसांनी तिचे निर्दयपणे हाल केले परंतु रमाबाई डगमगली नाही. तिने इंग्रज अधिकाऱ्यांना त्यांच्या अन्यायी वर्तनाबद्दल खडे बोल सुनावले. गावागावात जाऊन महादेव कोळी व ठाकर समाजातील लोकांना छळण्यात आले पण त्याचा काहीही फायदा इंग्रजांना झाला नाही.

**सन १८३६ चा हल्ला :**

सन १८३६ साली गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी याने मुंबईच्या राज्यपालाला राघोजीचा बंदोबस्त करण्यासाठी खलिता पाठविला. बक्षिसे व इनाम जाहीर करून माहिती काढण्याचा सल्लाही त्यांनी दिला होता. विशेष बाब म्हणून हजारोंची हत्यार बंद तुकडी खास या कामासाठी नेमण्याचा आदेशही त्यांनी दिला होता. राज्यपालांनी तातडीने हालचाली करून कॅप्टन गिल याची नेमणूक करून त्याच्या सोबतीला हजारांची फौज देऊन राघोजीचा बदोबस्त करण्यास सांगितले. कॅप्टन गिलला राघोजी भीमाशंकरला येणार असल्याची माहिती गुप्तहेरांकडून मिळाली होती. कॅप्टन गिलच्या आगमनाची वार्ता अगोदरच राघोजीला समजल्याने ते वेळीच सावध होते. हल्ला परताविण्याचे पूर्णपणे नियोजन राघोजीने केले होते. कॅप्टनने मंदिराला वेढा दिला व राघोजीला शरण येण्याचे आव्हान करू लागला. राघोजी मुळात मंदीरात नव्हताच तर गिलवर हल्ला करण्यासाठी आपल्या साथीदारासह लपून बसला होता. त्याने अचानक हल्ला केला संपूर्ण परिसरात अंधार असल्याने गिलच्या सैनिकांना काही सुचत नव्हते. खंडू साबळा, बापू भांगरा, देवजी आव्हाड यांच्या सोबत राघोजीने इंग्रज शिपायांना कापायला सुरूवात केली. प्रेतांचे ढिगारे साचले, रक्ताचे पाट वाहू लागले. हे सर्व पाहून कॅप्टन गिल हताश झाला. त्याच्याही पायाला व हाताला बंदुकीच्या गोळ्या चाटून गेल्या होत्या. नशिबानेच तो बचावला होता. कॅप्टन गिलला आपल्या वाटेला पुन्हा न जाण्याचा दम भरुन त्याला जीवनदान दिले. कॅप्टन गिलच्या पराभवाची खबर संपूर्ण देशभर पोहचली व त्याचा खूप मोठा हादरा इंग्रज सरकारला बसला.

राघोजीच्या पराक्रमाची माहिती हळूहळू आता मावळ मुलुखाच्या बाहेर जाऊ लागली होती. राघोजीने हाती घेतलेले स्वातंत्र्याचे कार्य सातारचे राजे प्रतापसिंह भोसले यांना खूप आवडले होते. इंग्रज सरकारने कपट कारस्थान करून भारतातील अनेक संस्थाने खालसा केली होती. साताऱ्याचे संस्थान देखील खालसा केल्याने राजे प्रतापसिंह यांची भेट घेतली. या भेटी दरम्यान महाराजांनी राघोजीला दोनशे पन्नास घोडे, हत्यारे, बंदुका, तलवारी, भाले आदीची भेट देऊन मोठ्या सन्मानाने बोळवण करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

सन १८४४ मध्ये भारताचे गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यांनी गाल्हेरचे संस्थान खालसा केले. अंतोबा लोटे हा सुभेदार पदावर होता. तो खूप कर्तृत्ववान असल्याने त्याला एक वेगळा मान होता. परंतु संस्थान खालसा झाल्याने त्याच्याही मनात इंग्रजांविषयी व्देष निर्माण झाला होता. याचा बदला घेण्यासाठी तो राघोजी भांगरे यांना येऊन मिळाला. यामुळे राघोजीची ताकद अधिक वाढली होती.

राघोजी भांगरे यांची ताकद व दरारा आता अधिक वाटला होता. आजपर्यंत इंग्रजाशी छुप्या मार्गाने आपण लढत आलो आहोत, आता समोरासमोर दोन हात करण्याची इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली होती. सन १८४५ मध्ये चार जिल्ह्यांचे कलेक्टर, गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट व राज्यपाल एलफिंस्टन यांना जुन्नर येथे आपण जाहीर उठाव करणार असल्याचे पत्रही पाठविले. सदर उठाव मोडीत काढण्याचे आवाहनही त्याने पत्रांतून इंग्रज सरकारला केले होते. जुन्नर ही त्या काळात एक महत्वाची बाजारपेठ असल्याने इंग्रजांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले होते. या उठावाला सामोरे जाण्यासाठी व राघोजीचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी धूर्त व धाडसी अधिकारी कॅप्टन मॅकीनतोश याच्यावर सोपविण्यात आली. बारकाईने अभ्यास केला व हा उठाव कसा रोखायचा व राघोजी कसा जाळ्यात अडकावयचा याचे नियोजन केले.

त्याने सोबत दहा हजारांची फौज व तोफखाना घेतला होता. राघोजीकडे फक्त दोन हजार सैनिक होते, शेवटी ठरलेला दिवस उगवला. राघोजी भांगरे व त्याच्या सर्व साथीदारांनी जुन्नरच्या बाजारपेठेत प्रवेश केला. दोन्ही सैन्य समोरासमोर येताच एकच लढाई सुरू झाली. राघोजीचे मावळे आपले सारे देह भान हरपून लढत होते. एकीकडे कॅप्टन मेकानतोश ची फौज कमी कमी होत होती तर दुसरीकडे राघोजीचे शंभर एक मावळे शिल्लक राहिले होते. ऐंशी टक्के फौज कामी येऊनही कॅप्टन मेकानतोश च्या हाती राघोजी भांगरे लागला नव्हता. जुन्नरच्या बाजार पेठेचा फायदा उठवत तो सही सलामत बाहेर पडला होता. जुन्नरच्या उठावात मोठ्या प्रमाणात साथीदार गमावल्याने राघोजी दु:खी झाला होता. आता भूमिगत राहून काम करण्याचा निर्णय घेतला. राया ठाकर व देवजी आव्हाड यांच्या सोबत त्याने गोसाव्याचे रूप धारण केले. मावळ प्रांतात गावोगावी फिरून लोकांना जागृत करण्याचे काम करू लागले. राघोजीला पकडण्यासाठी इंग्रजांनी दहा हजारांचे बक्षीस व गाव इनाम देण्याची घोषणा केली होती. **फाशी**

महानायक राघोजी फिरता-फिरता पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनाला पोहचला. चंद्रभागेत स्नान करून विठ्ठलाच्या दर्शनासाठी रांगेत उभे राहिले. वारीत उभे असताना दुरून एक पोलिस राघोजीचे निरीक्षण करत होता. राघोजीचे मात्र त्या पोलिसाकडे लक्ष नव्हते. पोलिसाला दर्शन रांगेत राघोजी भांगरे उभे असल्याची खात्री पटली. क्षणाचाही विलंब न करता त्याने कॅप्टन गिलला निरोप दिला. त्यावेळी गिलची नेमणूक तिथेच होती. निरोप मिळताच कॅप्टन गिल शेकडो पोलिसांना घेऊन मंदिरात हजर झाला. सर्वांनी राघोजीला वेढा दिला व त्याच्याकडे बंदुका रोखल्या राघोजी निशस्त्र असल्याने तो अलगद पोलिसांच्या जाळ्यात अडकला होता. साखळदंडात कैद करून सशस्त्र पोलिस बंदोबस्तात रोघोजीला ठाण्याच्या कारागृहात आणण्यात आले. त्याच्यावर खटला भरण्यात आला. राघोजी भांगरे यांच्या कोणत्याही मताचा विचार न करता एकतर्फी निकाल घोषित करण्यात आला. दुर्दैव म्हणजे राघोजीला वकील मिळू नये म्हणून इथल्याच उच्च वर्गीय लोकांनी प्रयत्न केले होते. कोर्टाने त्याला फाशीची शिक्षा जाहिर केली. राघोजीला फाशी देण्यापूर्वी वरिष्ठ इंग्रज अधिकाऱ्यांनी राघोजी भांगरे हा एक महान शूरलढवय्या, धाडसी वीर असल्याने त्याचे तैलचित्र काढून कारागृहात लावण्याचे आदेश दिले होते परंतु या आदेशाला देखील इथल्या उच्चवर्णीय लोकांनी हाणून पाडले. फाशीपूर्वी राघोजीला शेवटची इच्छा विचारण्यात आली तेव्हा ते म्हणाले -

"फाशी देण्यापेक्षा मला तलवारीने छेदा किंवा बंदुकीने उडवा परंतु मला फाशी देऊ नका, मला वीरमरण हवयं." असे त्याने इंग्रज अधिकाऱ्यांना ठणकावून सांगितले. परंतु निर्दयी इंग्रज सरकारला हे मान्य नव्हते. शेवटी आद्यक्रांतिकारक वीर राघोजी भांगरे यांना २ मे १८४८ रोजी ठाणे सेंट्रल जेल येथे फाशी देण्यात आली. अशा प्रकारे सह्याद्रीचा वाघ आपल्या मातृभूमीच्या रक्षणासाठी शहीद झाला.

***

**त्यास मानव म्हणावे का ?**

**" ज्योतीष रमल सामुद्रीकही**
**स्वर्ग नरकाच्या कल्पनाही**
**पशुत नाही त्या जो पाही**
**तत्यास मानव म्हणावे का ? "**

- सावित्रीबाई फुले

# सावित्रीबाई फुले यांचे जीवनचरित्र



**कु. सुरेखा रामा बांडे**
प्रथम वर्ष कला

**भारतीय पहिली स्त्री शिक्षिका :**

भारतीय समाजसुधारक शिक्षण तज्ज्ञ तसेच कवयित्री असलेल्या सावित्रीबाई फुले यांना भारतीय स्त्रीवादाची जननी मानले जाते. पती ज्योतीराव फुले यांच्या समवेत त्यांनी भारतातील महिलांना त्यांचे हक्क मिळविण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावली. जाती आणि लिंगावर आधारित लोकांवरील भेदभाव आणि अन्यायकारक वागणूक दूर करण्याचे काम त्यांनी केले. महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या चळवळीत त्यांना एक महत्वाचे स्थान आहे.

सावित्रीबाई फुले व ज्योतिराव फुले यांनी १८८४ मध्ये पुण्यातील भिडे वाडा येथे पहिली भारतीय मुलीची शाळा सुरू केली. महिलांसाठी शिक्षणांचे दार उघडण्याऱ्या अशा या महान क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा प्रेरणादायी जीवन प्रवास जाणून घेऊ या.

**सुरूवातीचे जीवन :**

सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील नायगाव या गावी झाला. नायगाव हे शिरवळपासून पाच किलोमीटर आणि पुण्यापासून सुमारे ५० किलोमीटर अंतरावर होते. सावित्रीबाई फुले या लक्ष्मीबाई आणि अनंतराव नेवसे पाटील यांची मोठी कन्या. ते माळी समाजातील होते. सावित्रीबाईंना कोणत्याही शाळेत पाठविण्याचा प्रश्नच नव्हता कारण त्या काळात वंचित आणि मागसवर्गीय मुलांना शाळेत शिकण्याचा अधिकारच नव्हता.

सावित्रीबाई फुले यांचा विवाह १८४० मध्ये ज्योतीराव फुले यांच्याशी झाला. त्या काळी बालविवाहाची परंपरा असल्याने लग्नाच्या वेळी सावित्राबाईंचे वय नऊ वर्षांचे होते. ज्योतीराव फुले हे विचारक, लेखक तसेच समाजसुधारक होते. सावित्रीबाई आणि ज्योतीराव यांना स्वत:ची मुले नव्हती असे म्हटले जाते. त्यांनी यशवंतराव या ब्राह्मण विधवेच्या मुलाला दत्तक घेतले तथापि याचा कोणताही मूळ पुरावा नाही.

**शिक्षण :**

पूर्वी स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नसल्यामुळे लग्नाच्या आधी त्या शिक्षणापासून वंचित होत्या. ज्योतीराव फुले पुरोगामी विचारांचे असल्याने त्यांनी घरातच सावित्रीबाईंना शिकवण्यास सुरूवात केली. त्यावेळी स्त्रीने शिक्षण मिळवणे हे एक प्रकारचा पाप मानला जात असे परिणामी ज्योतीरावांना विरोध सुरू झाला पण त्यांनी हार मानली नाही आणि सावित्रीबाईंना शिक्षण देण्यास सुरू ठेवले.

ज्योतीरावांना लहानपणापासून मातृप्रेम लाभले नाही त्यांची मावस आत्या सगुणाबाई एका अधिकाऱ्याच्या मुलाच्या दाई म्हणून काम करायच्या. त्यांना इंग्रजी कळायचे व बोलता ही यायचे. सावित्रीबाई आणि सगुणाबाई दुपारी ज्योतीरावांना भोजन देण्यासाठी शेतात जात असत. ज्योतीरावांनी शेताच्या मागील बाजूस आंब्याच्या झाडाखाली आंब्याची पातळ फांदीचे पेन बनवून त्या दोघींनाही जमिनीवर अक्षराची ओळख करून दिली. कोणाला माहित होते की जमिनीवरील धुळीवर कोरलेल्या अक्षरांतून एक तेजस्वीनी जन्माला येईल.

**सावित्रीबाई फुले यांचे प्रेरणास्थान :**

१८४० मध्ये ब्रिटिश अधिकाऱ्याची पत्नी मिस्सेलने पुण्यातील छाबिदासच्या वाड्यात मुलींसाठी सामान्य शाळा सुरू केली. सावित्रीही तिथेच शिकू लागली. शिक्षण घेत असताना सावित्रीने गुलामगिरी विरोधात काम करणाऱ्या थॉमस क्लार्क्सन यांचे जीवनचरित्र वाचले. ज्यात अमेरिकेच्या आफ्रिकन गुलामांच्या जीवनाची संघर्षमय शोककथा छापली गेली होती. सावित्रीबाईंना समजले की शिक्षण हे परिवर्तनाचे एक मजबूत साधन आहे. कारण अशिक्षित व्यक्तींना आपल्या हक्कांबद्दल जाणीव नसते त्यामुळे ते आपल्या

हक्क प्राप्तीसाठी संघर्ष करू शकत नाहीत. या पुस्तकामुळे त्यांच्यात शिकण्याची तीव्र इच्छा जागृत झाली नाही, तर समाजातील मुलींना शिक्षित करण्याचे स्वप्न देखील दिले.

**मुलीची पहिली शाळा :**

महिलांनी चूल आणि मूल पर्यंतच सीमित न ठेवता मुलींना शिक्षित बनवण्यासाठी १ जानेवारी १८४८ रोजी सावित्रीबाई फुले यांनी ज्योतीरावांच्या समवेत विविध जातीच्या ९ मुलींना घेऊन पुण्यातील भिडेवाड येथे मुलींसाठी पहिली शाळा स्थापन केली. त्याठिकाणी सगुणबाई देखील शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. या शाळेत मुलींना गणित, व्याकरण, भूगोल, भारतासह युरोप आणि आशिया खंडाचे नकाशे, मराठ्यांचा इतिहास, धोरण व बाल आकलनाचे विषय या सर्वांचा अभ्यास केला. देशाच्या शैक्षणिक विकासात आपले मोलाचे योगदान दिले. सदाशिव गोवंडे यांनी शाळेसाठी पुस्तकांची व्यवस्था केली. त्यानंतर काही महिन्यातच १५ मे १८४८ रोजी दलित वसाहतीत दलित मुलां-मुलींसाठी आणखी एक शाळा सुरू करण्यात आली. एका वर्षातच त्यांनी ५ शाळा स्थापन केल्या. केवळ महिला आणि दलितांच्या शिक्षण आणि आर्थिक विकासापुरत्या मर्यादित न राहता अल्पसंख्यांक समुदायाच्या शैक्षणिक स्थितीबद्दल ही त्यांना काळजी होती.

अनेक संघर्ष करत सावित्रीबाईंचा शिक्षण प्रसाराचा हा उपक्रम चालूच राहिला. त्या आपल्याबरोबर बॅगेत अतिरिक्त साडी घेऊन जात असत आणि शाळेत पोहोचल्यावर विरोधकांनी टाकलेली घाण साफ करून दुसरी साडी घालत असत. त्यांनी निवडलेला हा मार्ग काट्या-कुट्यांनी भरलेला होता परंतु त्या डगमगल्या नाहीत. त्यांना महिलांच्या शिक्षणासाठी व त्यांच्या हक्कासाठी काहीतरी करता आले याचा आनंद वाटत असे.

**बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापना :**

त्यावेळी समाजात बालविवाहाच्या प्रथेमुळे स्त्रिया तरुण वयातच मोठ्या संख्येने विधवा होत असत. समाजात विधवा महिलेला विवाह करण्यास मनाई होती यामुळे विधवा स्त्रिया अपमानित जीवन जगत असत. तसेच हिंसाचार, छळ आणि बलत्काराचाही बळी होत असत. बलात्कारामुळे गर्भवती झाल्यामुळे समाजात इज्जत नाही म्हणून सामाजिक भीतीपोटी महिलांचे आत्महत्यांचे प्रमाण वाढत होते. स्त्रियांवर होणारा हा अन्याय सावित्रीबाई फुले यांना सहन होऊ शकला नाही. २८ जानेवारी १८५३ रोजी गर्भवती महिलांसाठी निवारा व संरक्षणासाठी ज्योतीबांचा मित्र उस्मान शेख यांच्या घरी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली आणि पाळणाघरही सुरू केले.

**सावित्रीबाई फुले यांचे निधन :**

१८९७ मध्ये पुण्यामध्ये प्लेग नावाच्या साथीच्या रोगाने धुमाकळ होता. लोक पुणं सोडून जात होते. लोकांनी सावित्रीबाईंना पुणे सोडविण्याची विनंती केली परंतु त्या तयार झाल्या नाहीत. यातून उद्भवणारे हाल ओळखून सावित्रीबाईंनी प्लेगपीडितांसाठी पुण्याजवळ असलेल्या ससाणे यांच्या माळावर दवाखाना सुरू केला. एक दिवस एका प्लेगग्रस्त मुलाला आश्रमात आणण्याची कोणतीही व्यवस्था होऊ शकली नाही, त्यामुळे त्यांनी स्वत: त्या मुलाला खाद्यांवर घेऊन आश्रमात आणले. आपल्या स्वत:च्या प्रकृतीचीही पर्वा न करता प्लेगची लागण झालेल्यासांठी काम केले. दुर्दैवाने त्या स्वत:च प्लेगच्या भीषण रोगाच्या बळी ठरल्या आणि १० मार्च १८९७ रोजी पुण्यात त्यांचे निधन झाले. सावित्रीबाई आज आपल्यात नसल्या तरीही त्यांचे कार्य आपल्याला प्रेरणा देत राहील.

**सन्मान :**

सावित्रीबाईच्या सामाजिक कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून १९९५ पासून ३ जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिन हा बालकदिन म्हणून साजरा केला जातो. योगदानाचे महत्व अधोरेखित करीत भारत सरकारने दोन रुपयांचे डाकतिकीट जारी केले. २०१५ मध्ये महाराष्ट्र सरकारने पुणे विद्यापीठाचे नाव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे ठेवले आणि त्यांची स्मृती कायम केली. ३ जानेवारी २०१७ रोजी सावित्रीबाई फुले यांच्या १८६ व्या जन्मदिनानिमित्त त्यांचे गुगल डुडल प्रसिध्द करून गुगलने त्यांना अभिवादन केले.

***

# पर्यावरण संरक्षण



आशितोष तानाजी केकरे
तृतीय वर्ष विज्ञान

या पृथ्वीवर राबणारे सर्व सजीव पर्यावरणाच्या अंतर्गत येतात. ते जमिनीवर राहतात किंवा पाण्यात ते पर्यावरणाचा भाग आहेत. वातावरणात हवा, पाणी, सूर्यप्रकाश, वनस्पती, प्राणी इत्यादींचाही समावेश होतो. शिवाय पृथ्वी हा विश्वातील एकमेव ग्रह मानला जातो जो जीवनाला आधार देतो, पर्यावरण हे एक आवरण आहे जे सर्व सजिवांना जीवन देते.

पर्यावरणामुळे आपल्याला असे असंख्य फायदे मिळतात ज्यांची आपण आयुष्यभर परतफेड करू शकत नाही. ते जंगल, झाडे, पाणी, शुध्द करतात. पुराची शक्यता कमी करतात, नैसर्गिक संतुलन राखतात. निसर्गाने स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण कसे ठेवता येईल हे आपल्यावर सोपवले होते. पण माणसाने आपल्या लोभी स्वभावाच्या आणि विकासाच्या नावाखाली सुख–सुविधा वाढवल्या आहेत. तर दुसरीकडे पर्यावरण प्रदुषित करून मानवाला अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

पर्यावरण म्हणजे आपल्या आजुबाजुचे वातावण. पर्यावरण आणि मानव यांचे नाते खूप जवळचे आहे. माणसाच्या भौतिक गरजा पर्यावरणामुळे भागतात. आपल्याला पाणी, हवा इत्यादी घटक पर्यावरणातून मिळतात. शिवाय पर्यावरण त्याच्या कार्यप्रणालीवर बारकाईने नियंत्रण ठेवते. ते एका इकोसिस्टमसाठी आवश्यक असलेल्या महत्वपूर्ण प्रणालिंचे नियमन करते. या शिवाय ते पृथ्वीवरील सजीवांच्या जीवनाची गुणवत्ता राखते. पर्यावरण दररोज घडणाऱ्या विविध घटनांचे नैसर्गिक संतुलन राखण्यास मदत करतात. या गोष्टीमध्ये काही गडबड झाल्यास शेवटी मानव आणि इतर सजीवांच्या जीवनचक्रावर परिणाम करू शकतो. आपण पर्यावरणापासून आलो आहोत, प्रत्येकाच्या जीवनासाठी पर्यावरण हे खूप महत्वाचे आहे, कारण पृथ्वीवरील जीवन पर्यावरणातूनच शक्य आहे. सर्व मानव, प्राणी, नैसर्गिक वनस्पती, हवामान हे सर्व पर्यावरणामध्ये सामावलेले आहे. पर्यावरण केवळ हवामानाचा समतोल राखण्यासाठीच नाही तर जीवनासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी देखील प्रदान करते.

लोकांना पर्यावरणाचे महत्व समजावे आणि त्याबाबत जनजागृती व्हावी यासाठी ५ जून रोजी जागतीक पर्यावरण दिन साजरा केला जातो. पहिला पर्यावरण दिन ५ जून १९७३ रोजी साजरा करण्यात आला.

पर्यावरणाने आपल्याला आणि इतर सजिवांना हजारो वर्षांपासून वाढण्यास आणि वाढवण्यास मदत केली आहे. पर्यावरण आपल्याला पीक, जमीन, पाणी, हवा, पशुधन आणि जगण्यासाठी आवश्यक असलेल्या अनेक गोष्टी पुरवते.

आपल्याला पर्यावरणातून शुध्द हवा हवा मिळते. पर्यावरण हा एक जीवनाचा एक महत्वाचा भाग आहे. पर्यावरणामध्ये सेंद्रीय, अजैविक, नैसर्गिक आणि मानवनिर्मीत गोष्टींचा समावेश होतो. नैसर्गिक वातावरणात झाडे, झुडपे, नद्या, पाणी, सूर्यप्रकाश, प्राणी, हवा इत्यादींचा समावेश होतो. आपण प्रत्येक क्षणी श्वास घेत असलेली हवा, पाणी सोडून जे जगू शकत नाही आणि जे आपण आपल्या दैनंदिन जीवनात वापरतो या सर्व गोष्टी नैसर्गिक आहेत. या सर्व गोष्टीमुळे पृथ्वीवर जीवन शक्य होते ते वातावरणातच येतात. झाडे–वनस्पतींची हिरवळ सुध्दा मनाला एकवेगळीच शांती देते. अनेक प्रकारचे आजारही वातावरणातूनच दूर होतात.

पर्यावरण मानव, प्राणी आणि इतर सजीवांना वाढण्यास मदत करते. मानव हा देखील पर्यावरणाचा एक महत्वाचा भाग आहे. पर्यावरणाचा घटक असल्याने आपणही पर्यावरणाचे संवर्धन केले पाहिजे. आपले हे जीवन पर्यावरणावर टिकवण्यासाठी आपल्याला पर्यावरणाचे वास्तव जपावे लागेल.

आजच्या युगात पर्यावरणात प्रदूषण झपाट्याने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. जंगले तोडून मोठमोठ्या इमारती उभारल्या जात आहेत. मोटारीचा धूर, कारखान्यातील मशिनचा आवाज, या सर्वांमुळे खराब रसायनयुक्त पाणी, वायू प्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनी प्रदूषण, माती प्रदूषण होत आहे ही चिंतेची बाब बनली आहे आणि ही बाब अत्यंत धोकादायक आहे. त्यामुळे आपल्याला अनेक प्रकारच्या आजारांना सामोरे जावे लागते आणि आपले शरीर नेहमीच खराब होत असते. आज विज्ञान क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रसार झाला आहे, तर दुसरीकडे पर्यावरण प्रदूषण वाढण्यासाठी ते कारणीभूत आहे. आधुनिकीकरण, तंत्रज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पर्यावरणावर विपरित परिणाम होत आहे. मानव स्वत:च्या स्वार्थापोटी झाडे तोडत आहे आणि नैसर्गिक साधन संपत्तीशी खेळत आहे. त्यामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे, त्यामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे, एवढेच नाही तर मानवनिर्मित कारणांमुळे पृथ्वीवरील वातावरण, जलमंडळ इत्यादीवर परिणाम होत आहे आणि ग्लोबल वॉर्मिंगची समस्या निर्माण होत आहेत. जे मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक आहे.

निसर्गाचा समतोल राखायचा तर वनिकरण मोहिम उघडायला हवी व प्रत्येकाने संकल्प करायला हवा.

झाडे लाऊ झाडे जगवू। हिरवळ करूया अवनिवरी।।
प्रकृतीचे संरक्षण करूनी। विकृती पळवू दूरवरी।।
सृष्टीचा हा नियम पाळला नाही । हा नारा थांबवा तनमन
भूमातेचे जळले आहे।।
ही वसुंधरा जनसंख्येच्या भाराने रडते आहे ।।

असे चित्र सगळीकडे पाहायला मिळेल. महात्मा गांधींनी म्हटलेच आहे आपल्याला आपल्या गरजा भागवण्यासाठी निसर्ग पुरेसे देतो, परंतु आपल्या अमर्याद लालसांची पूर्तता करण्यास मात्र तो असमर्थ आहे. कर्मधर्म संयोगाने निसर्गावर ही वेळ येऊ नये. देताना निसर्गाने मानवासाठी इतके द्यावे की मानवाने त्याचे अस्तित्व पिऊन टाकावे, परंतु युवा पिढीने हिरहिरीने भाग घेऊन जनजागृती केली तर निसर्गातही चमत्कार होतील. प्रदूषणमुक्त निसर्ग पाहताना आम्हीही म्हणू –

नेमिची येतो मग पावसाळा ।
हे सृष्टीचे कौतुक कर बाळा ।।

आणि आपली मुलेबाळे देखील पावसात चिंब भिजत आनंदाने पावसाचे गाणे म्हणतील.

येरे येरे पावसा तुला देतो पैसा,
पैसा झाला खोटा पाऊस आला मोठा।

***

**● महात्मा फुले यांचे प्रेरणादायी विचार ●**

**१) स्त्री पुरुष सर्व कष्टकरी व्हावे।**
**कुटुंबा पोसावे आनंदाने।।**

**२) जप अनुष्टाने स्त्रिया मुले होती।**
**दुजा का करिती। मुलासाठी।**

**३) रंजले गांजले अनाथ पोसावे।**
**प्रीतीने वागावे। बंधुपरी।**

**४) विद्या सर्वा देई। सद्गुणांची हाव।**
**करी नित्य कीव। अज्ञान्यांची।**

**५) स्वत:ची लायकी विद्यार्थीदशेतच वाढवा.**

– महात्मा ज्योतीबा फुले

# माजी प्राचार्य टी. एन. कानवडे सरांच्या सहवासात ....



**पवार शाम बबन**

मी डिसेंबर १९९६ मध्ये सत्यनिकेतन संचलित ॲड्. मनोहरराव नानासाहेब देशमुख महाविद्यालयत शिपाई पदावर रूजू झालो.

अगदी सुरूवातीपासूनच प्राचार्य कानवडे सरांच्या सहवासात होतो. सरांचा करारी स्वभाव फारच कडक होता. सरांच्या राजदूतचा आवाज आला की सर्व स्टाफच सैरभैर व्हायचा. सरांची दमदार एन्ट्री व्हायची जो त्या वेळी समोर दिसेल त्याला कशाहून ना कशाहून झापायचे आणि मग त्याच्या योग्येतेचे काम देऊन त्याच्यावरच जबाबदारी सोपवायचे. त्यात भीती होती, अनेक कर्मचारी तोंड लपवायचे. सरांच्या समोर कुणी जाण्याचे धाडस करीत नव्हते. अवघ्या महाराष्ट्राचे लाडके दैवत श्रीहरी विठ्ठलाने प्रत्येकाला काहीना काही दिले. परंतु प्राचार्य कानवडे सरांना त्याचा रंग दिला आणि सौ. मॅडम (ताई) आम्ही पाहिल्यापासून त्यांना ताईच म्हणतो त्या माऊलीला रूख्मिणीचे रूपच प्राप्त होते. गोल चेहरा, ताईंचा स्वभाव मात्र मायाळू होता, पण सर खूपच कडक आणि कठीण होते.

त्यांच्याकडे जमेची बाजू एकच होती ती म्हणजे स्टाफपैकी कुणीही कर्मचारी किंवा त्यांचा कुटुंबापैकी कुणीही आजारी असल्याचे समजले तर लगेच हातातील कामे बाजूला करून धावून जायचे आणि सर्व समस्या दूर करायचे. एकदा मीच संगमनेर येथे ॲडमीट होतो. माझे मुतखड्याचे ऑपरेशन होते, तेव्हा संगमनेरला येऊन मला भेटले, औषधोपचारासाठी पाच हजार रुपये दिले आणि डॉक्टरांशी सुध्दा बोलले की काही अडचण आल्यास सांगा पण पेशंटला लवकारात लवकर बरं करा. मी जोपर्यंत हॉस्पिटलला होतो तो पर्यंत रोजच सकाळ संध्याकाळ डॉक्टरांना फोन करून माझ्या विषयी चौकशी करायचे. स्टाफमध्ये कुणाचे लग्न असो, घरभरणी असो कितीही लांब असो हजेरी लावायचेच. त्याहून पुढे कर्मचाऱ्यांच्या मुलामुलीच्या लग्नालाही ते कधीच गैरहजर राहीले नाही. कुठल्याही कार्यात आगदी जातीने लक्ष द्यायचे. हे सर्व करीत असतांना शारीरिक व मानसिक त्रास व्हायचा परंतु कधीच बोलून दाखवले नाही. पण शिस्तीच्या बाबतीत म्हणाल तर नाकातील केस जळतील, डोळ्यांतून पाणी येईल असे खेकसायचे परंतु कागदावर कधीच कारवाई केली नाही. महाविद्यालयात एखादा कार्यक्रम असेल तर चार दिवस आधीच प्राध्यापकांची वेगळी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वेगळी मिटिंग घेऊन अगोदरच सर्व नियोजन करून प्रत्येकावर वेगवेगळी जबाबदारी सोपवायचे. कार्य पूर्ण होईपर्यंत कुणाला सुट्टी नाही.

येवढं करूनही कोणी चुकला तर त्याची खैर नाही, अगदी पाहूण्यांदेखतच झापणी करायचे आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा जवळ करायचे आणि म्हणायचे, 'काय रे बबड्या, काय चाललंय.' असे अपुलकीने विचारून त्याच्या मनातलं किष्मिश लिलया दूर करायचे. महाविद्यालयात वावरतांना झाडांकडे प्रामुख्याने लक्ष द्यायचे. आधीच महाविद्यालय परिसर म्हणजे अगदी खडकाळ माळरान होते. परंतु सरांनी सर्व कर्मचाऱ्यांना आणि विद्यार्थ्यांना हाताशी धरून खड्डे खोदले, स्वत:ही टिकाव फावडे घेऊन आम्हाला मदतही केली. नर्सरी मधून विविध प्रकारची रोपे आणून लावले. त्यांचे संगोपन करण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांना पाणी द्यायला लावायचे आणि झाडाच्या भोवतीचे गवत काढायला सांगायचे. तसेच प्राध्यपकांना सुध्दा झाडांसाठी खतनिर्मिती म्हणजे गांडूळखत प्रकल्प उभारून प्रत्येक झाडाला योग्य प्रमाणात खत टाकायला लावायचे. त्याचाच परिणाम म्हणून महाविद्यालयाचे नंदनवनात रूपांतर झाले. विविध प्रकारचे पक्षी फुलपाखरे त्याठिकाणी आनंदाने बागडतांना दिसतात. महाराष्ट्र शासनाने सुध्दा या कार्याची चांगली दखल घेऊन वृक्षमित्र पुरस्काराने गौरव केला आहे. तसेच नॅक मूल्यांकन समितीनेसुध्दा दखल घेऊन उच्चप्रतिचा दर्जा महाविद्यालयास प्राप्त झाला. असे हे किमयागार प्राचार्य कानवडसर ॲड्.एम.एन. देशमुख महाविद्यालय आणि कर्मचाऱ्यांस लाभले. अजुनही त्यांचा स्वभाव फारसा मवाळ नाही. अजूनसुध्दा तोच दरारा आणि तोच कडकपणा अंगी आहे. असा अवलिया पुन्हा होणे नाही. अस्तित्वात नसलेल्या व्यक्तींच्या जीवनभर किंवा कार्याबद्दल अनेकांनी भरभरून लेखन केले पण जे आजही आस्तित्वात आहेत त्यांच्या बद्दल लिखाण करणारे हात फारच कमी आहेत. मी माझा एक फाटका प्रयत्न केला आहे.

***

# मी आहे ना ...

कु. खाडगीर भारती दत्तू
प्रथम वर्ष विज्ञान

आपल्या आयुष्यात आलेली माणसं ही काही उगाच आलेली नसतात. प्रत्येक गोष्टी मागे काहीतरी कारण असतं. कुणाशी तरी काहीतरी ऋणानुबंध जुळलेले असतात. नाहीतर सव्वाशे करोड लोकसंख्येच्या देशात नेमक्या याच व्यक्तीशी आपली ओळख का होते ? याचे उत्तर कोणीही देऊ शकत नाही.

जी नाती तयार होतात ती आपण जीवापाड जपावी. आपल्या जगण्यासाठी प्राणवायुची गरज असते तो प्राणवायू म्हणजे ही आपली माणसं. रक्ताच्या नात्यांना काही चॉइस नसतो पण आपलेपणाच्या नात्यात तसं नसतं. “Its mutual relation” मनं जुळली की आपलेपणाचं नातं तयार होतं.

जे बंध खूप स्ट्राँग असतात ते कोणाच्याही सांगण्याने किंवा विपरित परिस्थितीत कधीच तुटत नाहीत. आपण खूप वाईट परिस्थितीतून जात असताना मित्राचे किंवा मैत्रिणीचे मी आहे ना ... एवढेच शब्द संजीवनीसारखे सोबत असणं खूप सकारात्मक ऊर्जा देणारं असतं. पैशांनी श्रीमंत होणं खूप सोपं आहे हो... नात्यांनी समृध्द होणं तितकंच कठीण.. म्हणून Keep in touch ...

***

<u>संस्कृत विधेसंबंधी लोकहितवादींचे विचार</u>

**संस्कृत विद्या मोठी गहन आहे व तिचा उपयोग मोठा आहे, असे शास्त्री, पंडित वगैरे सांगतात. पण प्रत्यक्ष व्यवहारात या विद्येचा काहीच उपयोग होत नाही. विविध इच्छापूर्तीसाठी ब्राह्मण अनुष्ठाने, जप, तप, मंत्र करावयास सांगत असत. पण आता त्यामुळे कोणतीही इच्छा पूर्ण होत नाही, असे लोकांना माहीत झाले आहे.**

**सध्याच्या काळचे पंडित हे बहुरुपी, सोंगाडे यापेक्षा वेगळे नाहीत. शास्त्र, पंडित यांना व्यावहारिक ज्ञान नाही. ते वादासाठी वाद घालतात. शास्त्र, पंडित हे हिंदू लोकांचे पुढारी आहेत, हे दुर्भाग्य आहे. शास्त्री, पंडित १२ ते १५ वर्षे व्याकरणाचा अभ्यास करतात, हा त्यांचा अभ्यास निरुपयोगी आहे. शास्त्री, पंडित हे निरुपयोगी आहेत. त्यांच्यापासून देशाचे हित होत नाही, मुर्खपणा मात्र वाढतो.**


घट्ट विणावं पण
उसवू नये कधीच
धागा धागा गुंफावा
तुटू नये कधीच
हात धरावा असा
जो सुटू नये कधी
एक नातं असं जे
तुटू नये कधीच

# पद्य विभाग

# चूक



क्षणोक्षणी चुका घडतात
आणि श्रेय हरवून बसतात
आपल्याच रिकाम्या ओंजळी आपल्याला
फार काही शिकवत असतात
कणभर चुकीलाही आभाळाएवढी सजा असते
चूक आणि शिक्षा यांची कधी
ताळेबंदी मांडायची नसते
एक कृती, एक शब्द
एकच निमिष हुकतं-हुकतं
उभ्या जन्माच्या चुकामुकीला
तेवढं एक निमित्त पुरतं
अळेर हे सारं घडतं केवळ आपण काही
शिकवण्यासाठी
आपण मात्र शिकत असतो
पुन्हा पुन्हा चुकण्यासाठी ...

**कु. वाकळे ज्योती रंजन**
तृतीय वर्ष विज्ञान
***

**इष्ट असेल ते बोलणार**
**आणि साध्य असेल ते करणार !**
– समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर

‘’

# कसं जगायच ?



आयुष्य जगणं ही एक कला आहे,
कसं जगायचं हे ज्याचं त्यानं ठरवायचं
दु:ख सगळ्यांनाच असतात
दु:खाला हसत जगायचं की दु:खात पिचत जगायचं
हे ज्याचं त्यानं ठरवायचं..
उद्याच्या चिंता सगळ्यांनाच असतात
पण उद्याची शाश्वती कोणालाच नसते
उद्यासाठी आज मरायचं
की आजच्या दिवसात संपूर्ण आयुष्य जगायचं
हे ज्याचं त्यानं ठरवायचं...
समाजात जर आपलं अस्तित्व टिकवायच असेल
तर स्पर्धा अटळ आहे
पण ही स्पर्धा दुसऱ्याशी आहे की
स्वत:शी हे ज्याचं त्यानं ठरवायचं...
समाज हा दुसऱ्याची निंदा करण्यासाठीच असतो
कोणासाठी जगायचं? स्वत:साठी की समाजासाठी
हे ज्याचं त्यानं ठरवायचं...
आयुष्यात सुखाचेही चार क्षण येतात
टिपभर सुखात सुख मानायचं कि
सुख वाटून वाढवायचं
हे ज्याचं त्यानं ठरवायचं...
कोणाच्यातरी आदर्शावर जगायचं कि
स्वत:चा आदर्श सोडून जगायचं
हे ज्याचं त्यानं ठरवायचं...
प्रत्येक सामान्य माणसात
काहीतरी असामान्य असतेच
सामान्य म्हणून जगायचं कि
असामान्य म्हणून
हे ज्याचं त्यानं ठरवायचं...
पृथ्वीवर किडे-मुंग्याही जगतात पण
सावज म्हणून जगायचं की शिकारी म्हणून
हे ज्याचं त्यानं ठरवायचं...

**कु. रुपाली भाऊ धिंदळे**
प्रथम वर्ष कला




# कॉलेजचे दिवस

नटून थटून मिरवयाचे, कधीतरी पीरियडला बसण्याचे
कॅन्टीन मध्ये गप्पा मारण्याचे, खरे मित्र मिळवण्याचे
कॉलजचे दिवस...
वेडी स्वप्नं घेऊन जगण्याचे, भावी आयुष्याची चिंता
खोटे-खोटे रूसायचे, खिशात पैसे नसतील तरी हसण्याचे
कॉलजचे दिवस ...
एकतर्फी प्रेम करण्याचे, दुसऱ्याचा प्रेमात अडथळे आणण्याचे
खरा खुरा जीवनसाथी शोधण्याचे, जीव ओवाळून टाकण्याचे
कॉलेजचे दिवस ......
कटू-गोड आठवणीचे, प्रेमातील यशापयशाचे
खूप धमाल करण्याचे, पुन्हा पुन्हा हवेहवेसे वाटणारे
कॉलेजचे दिवस ...

**कु. वाकळे ज्योती रंजन**
तृतीय वर्ष विज्ञान

**अनादी मी, अनंत मी अवध्य मी भाषा।**
**मारील रिपु जगती असा कवण जन्मा।**
- स्वातंत्र्यवीर सावरकर




# विज्ञान युगातील तू...

विज्ञान युगातली अबला नव्हे तू
तुझ्या छळाच्या तऱ्हा निराळ्या
तुझ्या वेदनेचे हुंकार वेगळे
तुझ्या जखमांच्या खुणा वेगळ्या ।।
तू जगली, तू जागली, तू मोठी झाली
तू शिकली, तू सवरली, तू स्वयंभू झाली..
तुझ्या प्रगतीची पताका फडके आकाशी
आता तुझ्या वेदनेचे हुंकार वेगळे
तुझ्या जखमांच्या खुणा वेगळ्या ।।
तू कन्या, तू भगिनी, तू माता, तू जननी
तू मैत्री, तू प्रेम, तू साथी, तू सजनी..
तुझी अनंत रूपे व्यापती विश्वाला
तुझ्या वेदनेचे हुंकार वेगळे
तुझ्या जखमांच्या खुणा वेगळ्या ।।
तू ना कधी थांबली, लढतच राहिली,
तू हार कधी ना पाहिली
आताही लढ पार कर विजय दृष्टिपथी आला
तुझ्या वेदनेचे हुंकार वेगळे
तुझ्या जखमांच्या खुणा वेगळ्या ।।
विसरुन ओरखडे भूतकाळीचे
तुझाच आहे हा आज अन् भविष्यही
तुझाच आवाज गर्जत राहो या आसमंती
ऐकू दे तुझ्या विजयाचे जयजयकार
तुझ्या यशाच्या खुणा वेगळ्या ।।

**कु. उज्वला किसन घोडे**
तृतीय वर्ष विज्ञान



# आई

पुन्हा एकदा जन्म घेईन आई तुझ्या पोटी
खूप कष्ट केलेस, खूप घेतलास त्रास आई
दारिद्र्यं तर फिरकलेच नाही आमच्या आसपास..
नाही कमी पडली जेवणात तूप रोटी
काबाडकष्ट करण्याचा तू घेतला होतास ध्यास
स्वत: राहून उपाशी भरवाला आम्हाला घास
तुझ्या स्पर्श होता मला होतो देवाचाच भास
असू शकतो का गं देव तो याहून वेगळा खास,
खंत एकच राहील नेहमी माझ्या मनात...
देऊ शकेन का म्हातारपणी मी तुजला साथ
म्हातारपणी सोडून तुजला मी जाऊ कसा आई
केले प्रयत्न खूप पण राहीले नाही अंगात त्राण
पुन्हा एकदा जन्म घेईन आई तुझ्या पोटी...

**विशाल भाऊ धिंदळे**
प्रथम वर्ष कला

**हे मातृभूमी,**
**"तुजसाठी मरण ते जनन।**
**तुजवीण जनन ते मरण।"**
– स्वातंत्र्यवीर सावरकर



# जगणं

आयुष्यभर सोबत असून
जवळ कधी बसत नाही,
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकांस दिसत नाही,
हरवला तो आपसांतला,
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकांस दोष देऊन
नित्य चाले वादविवाद,
धाव धाव धावतो आहे
दिशा मात्र कळत नाही,
ह्दयाचे पाऊल कधी
ह्दयाकडे वळत नाही,
इतकं जगून झाल पण,
जक्षायला वेळ नाही,
जगतो आहोत कशासाठी
कशालाच कशाचा मेळ नाही,
क्षण एक येईल असा
घेऊन जाईल हा श्वास,
अर्ध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास,
अजुनही वेळ आहे,
थोडं तरी जगून घ्या,
सुंदर अशा जक्षण्याला,
डोळे भरून बघून घ्या,

**कु. अक्षदा पाबळकर**
प्रथम वर्ष वाणिज्य



# तुझ्याशी बोलयचं होतं...

ओल्या चिंब नभातून
पावसाला बरसायचं होतं
ओल्या पावसात चिंब भिजायचं होतं
खूप काही तुझ्याशी बोलायचं होतं...
निळ्याशार आकाशातील
चांदण्यांच्या शीतल प्रकाशात
एकमेंकाजवळ येऊन
एक व्हायचं होतं
खूप काही तुझ्याशी बोलायचं होतं...
पाखरासारखं आकाशात उंच
विहार करताना
मनातलं सर्व सांगायचं होतं
खूप काही तुझ्याशी बोलायचं होतं...
सागराच्या ओल्या किनाऱ्यावर
पाय रेतीत घट्ट रोवून
घर छोटसं बांधायचं होतं
खूप काही तुझ्याशी बोलायचं होतं...

**लक्ष्मण पुंडलिक गोडे**
तृतीय वर्ष विज्ञान



# भावना मनातल्या

कधी कधी स्वत:ला खूप एकटं वाटत...
मनातल्या मनातच सगळं दाटतं..
कधी खुपच विचार केला जातो...
तर कधी विचार तसाच अपूर्ण राहतो...
कधी अश्रुही येतात पण
ते पुसणारे हात नसतात...
आधाराची गरज असते
पण खांदेच नसतात...
आयुष्य नकोसं वाटतं एका क्षणाला...
पण पुन्हा एक उभारी देते मनाला..
खुपदा मी परिस्थितीपुढे हारतेय...
मीच पुन्हा स्वत:ला सावरतेय...
अपेक्षा कोणाकडून नाही ठेवायची
ठरवते मी मनात..
मन तोडणारे खूप भेटतात
आलंय माझ्या लक्षात ....
हळू हळू आता असच
जीवन चाललंय...
मन जरी खचलं तरी
आयुष्य पुढे सरकतंय...

**कु. मेघा कांतीलाल आवारी**
प्रथम वर्ष विज्ञान

# कवी कसा असावा ...

कवी कसा असावा
लेखणीत त्याच्या समाज दिसावा
विचार त्याचा चौफर असावा
स्वत:बद्दल त्याला विश्वास असावा
पण त्याच्या मनी अहंकार नसावा
ज्ञानाचा तो तेजोमय प्रकाश असावा
सगळ्यांच्या हृदयात तोच वसावा
तो जनांचा मित्र असावा
अन्यायाचा तो कर्दनकाळ असावा
लेखणीपुढे त्याच्या तलवारही नत व्हावी
कवी असा योध्दा शूरवीर असावा
कवि कसा असावा-
कर्णासारखा दानवीर असावा
कृष्णासारखा नीतीपारंगत असावा
अर्जुनासारखा एकाग्र असावा
भिष्मासारखा प्रतिज्ञावीर असावा
प्रेमिकांचा लाडका असावा
मनी त्यांच्या सदैव वसावा
वीराची तो प्रेरणा असावा
सदैव त्यांना स्फूर्ती द्याया
समाजाचा आरसा असावा
पिढ्यां-पिढ्यासाठी तो वारस असावा
कोणत्याही धर्माचा तो मसिहा नसावा
सर्व दृष्टीने एक उत्तम माणूस असावा
पाहाताच त्याला सर्वांच्या नजरेत असावा
जो पाहील त्याच्या नजरेत स्थिरावा
तो ज्ञानाचा विशारद असावा
प्राचीन अप्राचीन ज्ञानी असावा
पाहताच त्याला मनात वाटेल हेवा
त्याच्या मनात असेल कवितांचा ठेवा
संस्काराचा तो महामेरू असावा
परिस्थितीचा तो कधीही दास न व्हावा
उच्चारात तो स्पष्ट असावा
चेहऱ्यावरचा भाव लिखाणात रोखठोक दिसावा.

**कु. अक्षदा पाबळकर**
प्रथम वर्ष वाणिज्य

# कधी वाटते ...

कधी वाटते प्रसन्न इतकी सकाळ आहे...
कधी वाटते सगळे निरस रटाळ आहे...
उगाच कोणी खलनायक झालेला नसतो...
हर एक पत्राला त्याला भूतकाळ आहे...
किती वाजले होते नक्की तू जाताना....
त्यावेळेवर अजुन थांबवलेले घड्याळ आहे...
कोणी चोरले कोठे हरवले माहित नाही...
कधी पासून हृदय आपले गहाळ आहे...
संत व्हायचे हा कधी व्यवसाय नसावा...
संत कधी कुंभार, कधी मेंढपाळ आहे...

**कु. संतोषी मधुरकर**
तृतीय वर्ष विज्ञान



# मैत्री

जी व्यक्ती तुमच्यावर
विश्वास ठेऊन स्वत:च्या
सर्व गोष्टी सांगते
तुम्ही समजून जा ती व्यक्ती,
स्वत:पेक्षा तुमच्यावर
जास्त विश्वास ठेवते.

**कु.भारती दत्तू खाडगीर**
प्रथम वर्ष विज्ञान

# Chemistry

न ये chemistry होती न मै student होता!
न ये Lab होती, न ये Accident होता
अभी Practical में आई नजर एक लडकी!
सुंदर थी नाक उसकी Test tube जैसी!
बातों मे उसकी Glucose की मिठास थी!
सासों में Ester की खुशबू भी साथ थी।
आँखों से झलकता था कुछ इस तरह प्यार
कि बिन पिए ही हो जाता था Alcohol खुमार
Benzene सा होता था उसकी Presence का एहसास
अंधेरे में होता था Radium का अभास!
नेरे मिली Reaction हुआ
कुछ तरह Love का Production हुआ!
लगने लगे उसके घर के चक्कर ऐसे!
Necleus के चारों तरफ Electron हो जैसे!
उस दिन हमारा Confirmation हुआ!
जब उसके Daddy से हमारा Introduction हुआ!
सुन कर हमारी बात, वो ऐसे उछल पडे
Ignition tube में जैसे Sodium भडक उठे!
वो बोले, " होश में आओ पहचानो अपनी औकात!
Iron मिल नही सकता कभी Gold के साथ। "
ये सुन कर टूटा हमारे अरमानो भरा Breaker
और हम चुप रहे Bezaldehyde का कडवा घूट पी कर!
अब उस की यादों के सिवा हमारा काम चलना न था
और Lab में हमारे दिल के सीवा कुछ और जलता न था
जिंदगी हो गयी Unsaturated Hydrocarbon की तरह
और हम फिरते हैं आवारा Hydrogen की तरह

**लक्ष्मण पुंडलिक गोडे**
तृतीय वर्ष विज्ञान

# म्हणून नाही विचारलं मी तिला...

ती आवडली पण नाही विचारलं तिला...
डिलिट करेल मला फ्रेंड लिस्ट मधून
म्हणून नाही विचारलं मी तिला...
बोलणार नाही माझ्याशी,
म्हणून नाही विचारलं मी तिला...
चुकीच्या नजरेनं पाहील ती मला
म्हणून नाही विचारलं मी तिला...
समोर कसा जाणार तिच्या
म्हणून नाही विचारलं मी तिला...
गैरसमज करून घेईल ती माझ्याबद्दल
म्हणून नाही विचारलं मी तिला...
भेटून सुध्दा नाही भेटणार
म्हणून नाही विचारलं मी तिला...
कोणाला सांगूही शकणार नव्हतो की,
किती आवडते ती मला.
कसं सांगणार मी तिला की,
तू खूप आवडते मला.
भीती वाटते त्या एका 'नाही' ची
म्हणून नाही विचारलं मी तुला...
अजून किती व्हॅलेंटाईन डे निघून जातील,
पण नाही विचारणार मी तिला...
राहू दे मला अशा या गोड
गैरसमजुतीत की, आवडतो मी तिला...
आवडतो मी तिला...

**लक्ष्मण पुंडलिक गोडे**
तृतीय वर्ष विज्ञान

# कॉलेज लाईफ

आयुष्य रमलेले कॉलेजच्या कट्यावर,
नेहमीच्या त्या हक्काच्या अड्यावर.
मौजमजा अन् गप्पा मस्तीच्या रंगीत मैफिली,
आठवत राहावं कॉलेज लाईफ नेमकं संपून गेल्यावर,
लेक्चर बंक करून कधी जमतो कॅन्टीनमध्ये अड्डा,
अन पैजेवर खाल्ला जातो मिसळपाव अन वडा
होते कधी भरपूर हसी मजाक अन थोडा राडा
आठवणीत उरतो मग फक्त केलेला कल्ला तेव्हढा
कोणी एकच असते इथे ऐश्वर्या
अन् ढीगभर समजतात स्वत:ला सलमान,
प्रत्येकालाच वाटते तीच माझी काजोल
अन् मीच तिचा शाहरूख खान
तिला मिळवण्यासाठी कोणी बनतो राज आणि सिंघम
मोहब्बते अन रब ने बना दी जोडी करत,
होऊन जातो तेरे नाम अन् बेवफा सनम
आणि प्रेम वाटतं कभी खुशी आणि भरपूरदा गम
इथं प्रेम तर होत नाही कोणाचंच कोणावर खरं
कॉलेज संपता संपता तुटून जातं अफेअर
करिअर अन अभ्यासाने होती नुसती रोजची मरमर
कॉलेज लाईफ संपून जातं शोधण्यात आयुष्यातल प्रेम खरं
प्रेमही होत नाही अन् उरत नाही मग अफेरही
अन् एका टाईमपाससाठी कधी लढतात सख्खे मित्रही
आयटमवरच्या भांडणात मग संपून जाते मैत्रीही
कॉलेज संपले की वाटतं राहून गेलं निभावणे
मैत्री अन करायला प्रेमही...



# भाऊ...

आभाळाची साथ आहे
अंधाराची रात आहे
मी खुश आहे, कारण
माझ्या सोबत माझा
भाऊ आहे.
दिवसाची सुरूवात ही
त्याच्याशिवाय होत नाही
आणि रात्रीच्या शेवटही
त्याच्या शिवाय होत नाही
तो म्हणजे भाऊ
कितीही दु:खी असला
तरी दु:खाची जाणीव
न होऊ देणारा
तो म्हणजे भाऊ
कितीही राग आला
तरी मायेनं बहिणीला
हाक मारतो
तो म्हणजे भाऊ
आकाशात दिसती हजारो तारे
पण चंद्रासारखा कोणी नाही.
लाखो चेहरे दिसतात रोज
पण भावासारखा दुसरा नाही.

**कु. पूनम भरत पांडे**
तृतीय वर्ष विज्ञान

# बाप...



बाप स्वाभिमानी बाणा
बाप कणखर कणा
त्याच्या काळजात सुध्दा
लाजाळूची संवेदना.
त्याची पहाडाची छाती
त्याच्या हृदयात गुलाब
त्याच्या घामाच्या थेबांना
हिऱ्या मोत्यांचा रूबाब.
बाप तलवार ढाल
बाप पेटती मशाल
बाप जागतो म्हणून
घर झोपते खुशाल.
बाप घराचा पाया
आई त्यावर कळस
जेव्हा खचतो पाया
तेव्हा कोसळ घर.
उलाढाली करतो बाप
फक्त घरासाठी
शिव्याशाप जगाचे
बापाच्याच माथी
घर बायको अन् मुले
जगवण्यासाठी यांना
बाप होतो वेडापिसा
एका-एका पैशासाठी
बाप म्हणजे जशी
वाल्या कोळ्याची जमात
पापामध्ये ज्याच्या नाही
कोणी वाटेकरी होत.
बाप म्हणजे रे कसा
जसा पाण्यातला मासा
त्याच्या डोळ्यातला थेंब
कुणा दिसणार कसा
बाप साठवतो अश्रू
वाट पाही त्या क्षणाची
जन्मभराचे रडतो,
लेक जाताना सासरी
ज्याने जपले मुलांना
तळहाती पाकळ्यात
अशा बापासाठी यावी
थोडी आसवे डोळ्यात...
बाप थकल्यावरती
त्याचा बनावे आधार
नाही उपयोग पुन्हा
कितीही घातले पितर...

**कु. पूनम भरत पांडे**
तृतीय वर्ष विज्ञान

# काही कळलंच नाही ...

जेव्हा रिटायरमेंट जवळ येते ...
का कुणास ठाऊक
काही कळलंच नाही.
मन मात्र म्हणतंय तरूण आहे मी
कसा संपला ६ वर्षांपासून
६० वर्षांपर्यंतचा प्रवास
काही कळलंच नाही.
काय मिळवलं, काय गमवलं
काही कळलंच नाही.
संपलं बालपण, गेलं तरूणपण
केव्हा आलं वृध्दपण
काही कळलंच नाही.
केव्हा अण्णाचा बाबा झालो
काही कळलंच नाही.
कुणी म्हणतं साठी बुध्दी नाठी,
कोणी म्हणतं हाती आली काठी
काय खरं आहे ?
काही कळलंच नाही
आधी आईबापाचं चाललं
मग बायकोचं चाललं
मग मुलांचं चाललं
माझं कधी चाललं
काही कळलंच नाही.
मन म्हणतं तरूण आहे मी,
वय म्हणतंय वेडा आहे मी
या साऱ्या धडपडीत
केव्हा गुडघे झिजले
काही कळलंच नाही
काळ बदलला, वेळ बदलली,
मी बदललो मित्र बदलले.
निघून गेले किती नी राहीले किती
काही कळलंच नाही
मौजमस्ती करीत होतो मित्रांसोबत
केव्हा ज्येष्ठ म्हणून शिक्का बसला
काही कळलंच नाही.
सुना, जावई, नातू , पणतू
आनंदी आनंद झाला
केव्हा हसलं उदास जीवन
काही कळलंच नाही.
भरभरून जगून घे जीवा
म्हणू नकोस की मला
काही कळलंच नाही.

**शाम बबन पवार**

# मैत्री

जी व्यक्ती तुमच्यावर
विश्वास ठेऊन स्वत:च्या
सर्व गोष्टी सांगते
तुम्ही समजून जा ती व्यक्ती,
स्वत:पेक्षा तुमच्यावर
जास्त विश्वास ठेवते.

**कु.भारती दत्तू खाडगीर**
प्रथम वर्ष विज्ञान

# आई बाबा

आई–बाबाचं प्रेम चहाचा गाळणी
सारखं असतं, ते जगातील सर्व
चटके, संकटं, दु:ख गाळून
आपल्याला एक चांगलं आयुष्य
देण्याचं प्रयत्न करतं
खरंच या आई–बाबा
ग्रेट आहात तुम्ही...

**कु. भारती दत्तू खाडगीर**
प्रथम वर्ष विज्ञान

# विभाग अहवाल

# वार्षिक अहवाल २०२२ -२३

# राष्ट्रीय सेवा योजना

शैक्षणिक वर्षात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे राष्ट्रीय सेवा योजना विभागाने महाविद्यालयास ३०० विद्यार्थ्यांचे युनिट मंजूर केले आहे. या शैक्षणिक वर्षात या विभागाने नियमित कार्यक्रमांतर्गत स्वच्छता अभियान, रा.से.यो. दिन, शिक्षक दिन, महात्मा गांधी जयंती, वाचन प्रेरणा दिन, रेड रिबन एड्स जनजागृती, प्लास्टिक संकलन दिन, रन फॉर युनीटी, बिरसा मुंडा गौरव दिन, महात्मा फुले पुण्यतिथी, स्वामी विवेकानंद जयंती, जिजामाता जयंती, ममहात्मा गांधी पुण्यतिथी, महात्मा फुले जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, जल पे चार्चा, इ. कार्यक्रम घेण्यात आले.

या शैक्षणिक वर्षी रा.से.योजनेचे विशेष हिवाळी शिबीर मौजे देवगांव, ता.अकोले, जि. अ.नगर येथे दि.३ जानेवारी ते ९ जानेवारी २०२३ या कालावधीत घेण्यात आले. या शिबिरात १५० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. या शिबीरात वृक्ष संवेधन, वृक्षारोपण, स्वच्छता, व्यसनमुक्ती, बालविवाह बंदी, आरोग्य शिबिर, नवमतदार नावनोंदणी या विषयावर पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली. दि.२३/९/२०२२ रोजी राज्यस्तरीय व राष्ट्रीय प्रजासत्ताक पूर्व संचलन जिल्हास्तरीय निवड चाचणीसाठी तुषार महादेव डगळे व कु. शीतल पोखरकर या स्वयंसेवकांनी नगर येथे सहभाग घेतला तसेच दि. २४ व २५ मार्च २०२३ रोजी जिल्हास्तरीय गडसंवर्धन स्वच्छता मोहीम शिबिर, केंजळगड, ता. भोर, जि. पुणे येथे अक्षय बाळासाहेब घाटकर व तुषार महादेव डगळे या दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ९ मार्च ते ११ मार्च २०२३ या कालावधीत विद्यापीठस्तरीय जुन्नर पर्यटन शिबीरात गभाले ऋषिकेश संतोष, यादव शुभम चंद्रभान, व निखिल यादव या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच दि.३ ते ६ मार्च २०२३ या कालावधीत राज्यस्तरीय गिर्यारोहण रतनगड येथे डगळे तुषार माधव याने सहभाग घेतला.

**प्रा.बी. के. थोरात, प्रा.बी. एच. तेलोरे,**
**प्रा.डॉ.एल. बी. काकडे, प्रा.डॉ.डी. बी. तांबे,**
**प्रा.एस. आर. आसवले व प्रा.डॉ.एन. यू. देशमुख**

# राष्ट्रीय छात्र सेना

महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेनेचे ५० छात्रांचे युनिट असून या वर्षी ३९ मुले व ११ मुलींनी राष्ट्रीय छात्र सेनेत प्रवेश घेतला. या वर्षी विभागाने पुढीलप्रमाणे कार्यक्रम उपक्रम राबवले. योगदिन, हर घर तिरंगा अभियान, रन फॉर नॅशनल,युनिटी, पुनित सागर अभियान, रक्तदान शिबिर, स्वच्छ भारत अभियान. या वर्षी छात्रांनी पुढीलप्रमाणे कामगिरी पार पाडली.

१) छात्र आकाश जाधव व आकाश काकडे यांची भारतीय सेनेत अग्निवीर पदावर निवड झाली.

२) छात्र लक्ष्मण कोकतरे व प्रशांत खालकर यांची महाराष्ट्र पोलीस सेवेत निवड झाली.

३) छात्र किरण असवले यांची राज्य राखीव पोलीस दलात निवड झाली.

कार्याध्यक्ष

**लेप्टनंट प्रा. आर. सी. मुठे**

## विद्यार्थी विकास मंडळ

या विभागाने २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात पुढीलप्रमाणे विविध उपक्रम राबवले.

१) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना.
२) बागबगिचा निर्मिती व निगा
३) फळबाग व भाजीपाला उत्पादन
४) गांडूळ खत निर्मिती
५) जलतरण तलाव व महाविद्यालय परिसर स्वच्छता
६) निर्भय कन्या अभियान शिबीर
७) मतदार नोंदणी अभियान

या व्यतिरिक्त खालील प्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

१) महामानवांच्या जयंती/स्मृतिदिन
२) पर्यावरण दिन/वृक्षारोपण
३) दक्षता जागरूकता सप्ताह
४) युवक महोत्सव
५) संविधान दिन

## बहि:शाल शिक्षण मंडळ

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षी बहि:शाल शिक्षण मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाने डॉ.बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला व संत गाडगे महाराज व्याख्यान मालेचे आयोजन केले होते. दि. ९/१/२०२३ रोजी नानासाहेब विठोबा देशमुख सर्वादय विद्या मंदिर, कातळापूर येथे श्री. ज्ञानेश्वर कवाद यांच्या "अवघ्या विश्वाचे प्रेरणास्थान छत्रपती शिवाजी महाराज" आणि दिनांक ८/२/२०२३ रोजी गुरूवर्य रा. वि. पाटणकर सर्वोदय विद्या मंदिर, राजूर येथे श्री. विजयकुमार जोशी यांच्या "हसण्यावर टॅक्स नाही" या विषयावरील व्याख्यानाने व्याख्यानमाला संपन्न झाली.

केंद्र कार्यवाह
**प्रा. एस. बी. शिंदे**

## संगणक विभाग

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये संगणक विभागातर्फे महाविद्यालयातील प्रथम वर्ष कला, विज्ञान व वाणिज्य या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी संगणक साक्षरता अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना MS-Word, MS-Power Point, MS-Excel विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

या वर्षात संगणक विभागातर्फे M.Sc. (I & II) या विद्यार्थ्यांचे Chem Draw चे प्रॅक्टिकल आणि S.Y.B.Sc. या वर्गाचे पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन व एक्सेल करून घेण्यात आले. तसेच संगणक विभागातर्फे ११ वी व १२ वी विज्ञान व वाणिज्य या वर्गांच्या माहिती तंत्रज्ञान या विषयाच्या तासिका व प्रात्यक्षिके घेण्यात आली.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये विभागातर्फे महाविद्यालयातील सर्व संगणक तपासून त्यांची दुरूस्ती करण्यात आली. इंटरनेटची सुविधा देण्यात आली.

विभाग प्रमुख
**आवारी ए. बी.**

## Red Ribbon Club

१) दि.१२/८/२०२२ रोजी जागतिक युवा दिन साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ.बी.वाय.देशमुख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.
२) दि.२/१०/२०२२ रोजी श्री.राजेंद्र साळवे (एड्स एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र समुपदेशक) यांच्या प्रमुख उपस्थितीत Red Ribbon Club चे उद्घाटन करण्यात आले. या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांना एड्स आजार – कारणे व उपाय यावर मार्गदर्शन केले.
३) दि.१/१२/२०२२ रोजी जागतिक एड्स दिन साजर करण्यात आला. यावेळी प्रबोधनपर रॅलीचे आयोजन करण्यात आले. सर्वत्र पोस्टर व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या.
४) दि.१२/१/२३ रोजी स्वामी विवेकानंद जयंती साजरी करून हा दिवस राष्ट्रीय युवादिन म्हणून साजरा करण्यात आला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. दीपक पाचपुते यांनी स्वामी विवेकानंद व आजचा युवक या विषयावर विद्यार्थांना व्याख्यान दिले.

कार्याध्यक्ष,
**डॉ. आर. आर. सोनवणे**

## IQAC विभाग

आपल्या महाविद्यालयांतर्गत गुणवत्ता कक्ष कार्यरत असून खालील प्रमाणे उपक्रम राबविण्यात आले.
१) शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ चा IQAC नॅक ऑफिसला सबमीट करण्यात आला.
२) महाविद्यालयातील सर्व प्राध्यपकांचे बहीस्थ समितीकडून ॲकेडेमीक ऑडिट करण्यात आले.
३) १२/९/२०२२ रोजी आर्थिक साक्षरता अभियानांर्गत शिक्षक व शिक्षेकत्तर कर्मचाऱ्यासाठी निवेशक जागरूकता कार्यशाळा घेण्यात आली.
४) राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात झाले.
५) श्रध्दा चॅरीटेबल ट्रस्टला भेट देऊन विविध प्रस्ताव सादर करण्यात आले.
६) कॅस साठी प्राध्यापकांना मार्गदर्शन करण्यात आले.
७) IQAC ची तयारी झाली असून SSR साठीचे आवश्यक कागदपत्रे जमा करण्याचे काम चालू आहे.

IQAC समन्वयक
**प्रा. डॉ. बी. के. टपळे**

# माजी विद्यार्थी संघ

या विभागाने शैक्षणिक वर्षात पुढीलप्रमाणे कार्यक्रम, उपक्रम व कामगिरी केली.
१) माजी विद्यार्थी संघातर्फे डॉ. सागर वैद्य व डॉ. भाऊसाहेब ढोकळे यांचे भविष्यातील संशोधनाच्या संधी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन.
२) शैक्षणिक वर्षात ५७६ माजी विद्यार्थ्यांची माजी विद्यार्थी संघात नोंदणी.
३) दि. २८ जानेवारी २०२३ रोजी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन.

कार्याध्यक्ष
**प्रा. आर. सी. मुठे**

## विज्ञान मंडळ

विज्ञान विषयक जनजागृती व विज्ञान शाखेतील नवीन संधी हे उद्दीष्ट्ये ठेवून महाविद्यालयात विज्ञान मंडळ कार्यरत आहे. या वर्षी २८ फेब्रुवारी या जागतिक विज्ञान दिनाचे आयोजन करून विज्ञान मंडळामार्फत २७ व २८ फेब्रुवारी २०२३ रोजी विद्यार्थ्यांसाठी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

१) पदवी व पदव्युत्तर स्तरावर विज्ञान प्रश्न मंजूषा

२) विज्ञान विषयक निबंध स्पर्धा

३) विज्ञान विषयक पोस्टर स्पर्धा

पदवी स्तरावरील विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये कु. गोडसे ज्ञानेश्वरी सुधीर या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक मिळविला. पदव्युत्तर स्तरावरील विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये कु. डावरे अस्मिता मच्छिंद्र प्रथम आली. विज्ञान विषयक निबंध स्पर्धोमध्ये कु. वाकळे ज्योती रंजन हिचा प्रथम क्रमांक तर विज्ञानविषयक पोस्टर स्पर्धेमध्ये कु. सावळे ऋतुजा देवराम हिने प्रथम स्थान मिळवले.

कार्याध्यक्ष :

**प्रा. कडलग एस. डी, प्रा. साळुंखे एम. एस.**

**प्रा. कासार राजेंद्र, प्रा. हांडे एस. वाय.**

## कलामंडळ :

कलामंडळाने या शैक्षणिक वर्षात पुढील उपक्रम राबवले.

१) कलामंडाळाचे उद्‌घाटन इजि. प्रा. मुकुंद भोर यांचे हस्ते दि.३० सप्टेंबर २०२२ रोजी पार पडले. यावेळी प्रा. मुकुंद भोर व शिवराम भोर यांच्या समुहाने पोवाड्याचा व समाजप्रबोधनपर गीतांचा कार्यक्रम सादर केला.

२) राजूर ग्रामपंचायत आयोजित महाराष्ट्राची लोकधारा कार्यक्रमात दि. २६ जानेवारी २०२३ रोजी महाविद्यालयाच्या कलाकारांनी समाज प्रबोधनपर एकांकिका सादर केली.

कलामंडळ प्रमुख

**प्रा. विनोद येलमामे, प्रा. डॉ. आर. डी. ननावरे,**

**प्रा. एस. बी. शिंदे, प्रा. डी. व्ही. धोक्रट**

**प्रा. अतुल शाळिग्राम**

## जिमखाना विभाग :

१) अहमदनगर जिल्हा आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेची चॅम्पियनशिप महाविद्यालयाने प्राप्त केली.

२) कोल्हापूर येथे आखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेसाठी शुभम लांडगे, भाऊसाहेब सदगीर व सुदर्शन हराळ यांची निवड झाली.

३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघातून राम वने व पल्लवी खेडकर या कुस्तीपटूंनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

जिमखाना विभाग प्रमुख

**प्रा. नवले व्ही. बी.**

# करिअर कट्टा व प्लेसमेंट सेल

या विभागाने शैक्षणिक वर्षात पुढीलप्रमाणे कामगिरी, उपक्रम पार पाडले.

१) इन्स्टियूट फॉर ॲडव्हान्स स्टडीज, पुणे व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन.

२) निवेशक जागरूकता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

३) दि.२४ मार्च २०२३ रोजी पोराईट इंडिया प्रा. लि. या बहुराष्ट्रीय कंपनीचा कॅम्पस इंटरव्हू आयोजित केला, त्यात महाविद्यालयाच्या ७ विद्यार्थ्यांची असिस्टंट ट्रेनी म्हणून निवड झाली.

४) विद्यार्थ्यांना ३६५ रुपयात पाच वर्षे स्पर्धा परीक्षा तसेच उद्योजकता विकासविषयक मार्गदर्शन करण्यात आले.

कार्याध्यक्ष

**प्रा. आर. सी. मुठे**

# विद्यार्थिनी मंच

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विद्यार्थिनी मंच विभागाच्या वतीने दि. ९ मार्च २०२३ रोजी लिंग समानता या विषयावर सामाजिक कार्यकर्त्या उज्वला हासे (क्षेत्रीय समन्वयक लोकपंचायत, संगमनेर) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. भाऊसाहेब देशमुख यांनी मुलींना शिक्षण तसेच विवाह या दोन्ही क्षेत्रात निवडीचे स्वातंत्र्य दिले पाहिजे असे मत मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जयश्री शिंदे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. दीपमाला तांबे यांनी करुन दिला, सूत्रसंचालन प्रा. धिंदळे मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन विद्यार्थिनी मंचच्या अध्यक्ष प्रा. डॉ. रेखा कढणे मॅडम यांनी केले. या प्रसंगी प्रा. डॉ. व्ही. एन. गिते, प्रा. डॉ. बी. टी. शेणकर, प्रा. जे. डी. आरोटे, प्रा. टी. एच. सावंत इ. प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या व्याख्यानाचा लाभ वाणिज्य शाखेतील ५० विद्यार्थिनींनी घेतला.

कार्याध्यक्ष

**प्रा. डॉ. रेखा कढणे, प्रा. डॉ. दीपमाला तांबे**

**प्रा. सुलोचना धिंदळे**

# ग्रंथालय

आपल्या महाविद्यालाचे ग्रंथालय हे नवीन, स्वतंत्र व सोयीसुविधायुक्त इमारतीत चालविले जाते. आज ग्रंथालयात एकूण २२,३७९ इतकी ग्रंथसंपदा असून त्यात कनिष्ठ, वरिष्ठ व पदव्युत्तर वर्गाच्या कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या सर्व विषयांचे क्रमिक तसेच संदर्भग्रंथ व चारित्र्यग्रंथ, शब्दकोश, ज्ञानकोश, स्पर्धा परीक्षा, सामान्य ज्ञान, चालू घडामोडी व अद्ययावत माहिती देणारे ग्रंथ समाविष्ट आहेत. तसेच अनेक नियतकालीके व वर्तमानपत्रे आहेत. वर्तमानापत्रांमधून विविध विषयांची कात्रणे काढून त्यांचे संच व प्रश्नपत्रिकांचे संच तयार केले जातात. प्रत्येक प्रकारचे साहित्य ग्रंथलयात प्रदर्शनीय जागी प्रथम मांडले जातात. ग्रंथालयात इंटरनेट सेवाही उपलब्ध आहे. अशा विविध साहित्यामुळे व सेवांमुळे वाचक व ग्रंथ संपदेच्या दृष्टीने ग्रंथालय समृध्द होत आहे.

**प्रा. अतुल शाळिग्राम**

ग्रंथपाल

## वाङ्मय मंडळ

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षात वाङ्मय मंडळाच्या अंतर्गत काव्यवाचनस्पर्धा, निबंधस्पर्धा असे विविध उपक्रम घेण्यात आले. वाङ्मय मंडळाचे उदघाटन सोमवार दि.१९ सप्टेंबर २०२२ रोजी मा. प्रा. नितीन तळपाडे (यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा) व प्राचार्य संजय घिगे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी त्यांनी मराठी भाषेचे महत्व विशद केले. आपल्या भावना वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी लेखन केले पाहिजे असे मत मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. वाय. देशमुख हे होते. त्यांनी आपल्या मनोगतात भाषेचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीस सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून वाङ्मय मंडळाचे उद्घाटन संपन्न झाले. मान्यवरांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. वाय देशमुख यांनी केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय वाङ्मय मंडळाचे प्रमुख प्रा. डॉ. द. के. गंधारे यांनी करून दिला.

यावेळी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. बी. टी. शेणकर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ए. डी. सातपुते यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. शाम पवार (मामा) यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही विशेष सहकार्य केले.

विभाग प्रमुख

**प्रा. डॉ. द. के. गंधारे**

## शैक्षणिक व संशोधन विभाग:

१) प्रा. डॉ. विजय भगत, (अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले) यांचे शैक्षणिक व संशोधन विभागामार्फत आविष्कार संशोधन प्रकल्प या विषयावर दि. ८/०९/२०२२ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले.

२) महाविद्यालय पातळीवर दि.१५/९/२०२२ रोजी अविष्कार संशोधन प्रकल्प स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यांमध्ये ६ विद्यार्थ्यांनी ४ प्रकल्प सादर केले.

३) विभागीय पातळीवर दि. ६/१२/२०२२ रोजी अविष्कार संशोधन प्रकल्प स्पर्धा विळदघाट येथे संपन्न झाली. त्या मध्ये महाविद्यालयातील २ विद्यार्थिनींनी २ प्रकल्प सादर केले.

विभाग प्रमुख :

**प्रा. डॉ. पी. टी. करंडे**

**प्रा. डॉ. डी. के. गंधारे, प्रा. डॉ. एल. एल वाळे**

**प्रा. डॉ. आर. ए. कढणे**

## सहल विभाग

या शैक्षणिक वर्षात टी. वाय. बी. एस्सी. व एम. एस्सी. या वर्गाची शैक्षणिक सहल कोल्हापूर, प्रतापगड येथे आयोजित करण्यात आली सहलीत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर भेट देण्यात आली.

कार्याध्यक्ष :

**प्रा. डॉ. वाळे एल. एल.**

## वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा मंडळ :

१) वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा मंडळाचे उद्‌घाटन मा. प्रा. एस. झेड. देशमुख यांच्या शुभहस्ते आणि मा. पत्रकार विश्वासराव आरोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत दि ७/१०/२०२२ रोजी संपन्न झाले.
२) महाविद्यालयात कै. होनाजी तुकाराम कोंडार स्मृतिचषक राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा व कै. डॉ.माधवराव दिगंबर उमराणी स्मृतिचषक राज्यस्तरीय वत्क्तृत्व स्पर्धांचे दि. ५ व ६ एप्रिल २०२३ रोजी आयोजन करण्यात आले. या दोन्ही स्पर्धेचे सांघिक स्मृतिचषक न्यू आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज अहमदनगरच्या संघाने जिंकले.
३) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विविध महाविद्यालयातील वादविवाद व वक्तृत्व स्पर्धांमध्ये सहभाग घेतला व पारितोषिके जिंकली.

विभाग प्रमुख :
**प्रा. डॉ. पी. टी. करंडे**
**प्रा. ए. डी. सातपुते**
**प्रा. एस. एस. परते**

## भूगोल विभाग

१) प्रा. डॉ. एस. जी. वावळे, (अगस्ति कला,वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले ) यांचे आंतरमहाविद्यालय करारांतर्गत भूगोल विषयातील उच्चशिक्षण व रोजगाराच्या संधी या विषयावर दि.१७/४/२०२३ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले.
२) प्रा. डॉ. पी. टी करंडे यांचे महाविद्यालयाच्या रा.से.यो. च्या हिवाळी शिबीरात देवगांव येथे पर्यटन - एक रोजगार या विषयावर दि. ७/०१/२०२३ रोजी व्याख्यान झाले.

विभाग प्रमुख :
**प्रा. डॉ. पी. टी. करंडे**
**प्रा. एस. बी. शिंदे**

## परीक्षा विभाग

या शैक्षणिक वर्षात परीक्षा विभागाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्वानुसार महाविद्यालयाच्या तिन्ही विद्याशाखांच्या पदवी, पदव्युत्तर वर्गांच्या अंतर्गत व विद्यापीठ परीक्षा मा. प्राचर्यांच्या मार्गदर्शनाखाली व संस्थेच्या सहकार्याने सुरळीतपणे पार पाडल्या.

## आरोग्य तपासणी विभाग

या शैक्षणिक वर्षी आरोग्य तपासणी विभागाने दि. २५ मार्च २०२३ रोजी महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. या तपासणीसाठी संजीवनी आयुर्वेद महाविद्यालयाचे प्रा. डॉ. रविन चांडक व त्यांच्या टीमने मोलाचे सहकार्य केले.

कार्याध्यक्ष :
**प्रा. काकडे के. जे.**
**प्रा. डॉ. शिंदे एम. बी., प्रा. डॉ. सोनवणे आर. आर.**

## वाणिज्य विभाग

या शैक्षणिक वर्षात वाणिज्य विभागाने पुढीलप्रमाणे उपक्रमांचे आयोजन केले.
१) दि.१८ ऑक्टोबर २०२२ रोजी कॉमर्स असोशिएशनचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अरूण गायकवाड यांच्या हस्ते झाले.
२) प्राचार्य डॉ.अरूण गायकवाड यांनी कॉमर्स असोशिएशन उद्घाटन प्रसंगी ६ वाणिज्य शाखेतील आधुनिक तंत्रज्ञान व युवक या विषयावर व्याख्यान दिले.
३) या वेळी प्रा. डॉ. आर. जी रसाळ यांनी ६ बजेट २०२३ या विषयावर व्याख्यान दिले.
४) वर्षभरात तृतीय वर्ष वाणिज्य या वर्गातील ५८ विद्यार्थ्यांनी सह्याद्री ॲग्रो व फूड प्रा. लि.येथे इंटरर्नशिप प्रोग्राम यशस्वीपणे पूर्ण केला.
५) विभागामार्फत आयोजिलेल्या वाणिज्य महोत्सवात निबंधस्पर्धा, स्वयंस्फूर्त वक्तृत्व स्पर्धा, मिस्टर कॉमर्स, मिस कॉमर्स इ. स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

कार्याध्यक्ष :
**प्रा. डॉ. रेखा कढणे, प्रा.आस्वले एस. आर.**
**प्रा. तानाजी सावंत, प्रा. डॉ. एन. यू. देशमुख**

## मराठी विभाग

या शैक्षणिक वर्षात मराठी विभागाने पुढील उपक्रम राबवले.
१) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती, मंडळ व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १४ ते २८ जानेवारी २०२३ या कालावधीत मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषासंवर्धन पंधरवडा आयोजित करण्यात आला होता. त्या निमित्ताने काव्यसंमेलन, ग्रंथ प्रदर्शन, पुस्तक वाचन व मान्यवरांचे व्याख्याने,असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात होते. यात दि. २७ जानेवारी २०२३ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली प्रा.बारवकर एस.आर. यांनी मराठी भाषासंवर्धन व समाज या विषयावर व्याख्यान दिले.
२) मराठी विभागाच्या वतीने २७ फेब्रुवारी २०२३ रोजी ऑनलाईन पद्धतीने मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्तविक मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. द. के. गंधारे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. बी. वाय. देशमुख हे होते. यावेळी त्यांनी मराठी भाषेचे महत्व विशद करून कुसुमाग्रज यांच्या साहित्याबद्दल विचार व्यक्त केले.
कार्यक्रमाचे प्रमुख मान्यवर प्रो. डॉ. रसाळ आर. जी. (अर्थशास्त्र विभाग प्रमुख व उपप्रचार्य पी.व्ही.पी.महाविद्यालय प्रवरानगर) यांनी मराठी भाषेचे महत्व सांगितले. काळाच्या ओघात इंग्रजी भाषेची मुले मराठी भाषेकडे वळत आहेत हा आशावाद आहे. मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. आपल्या अभ्यासक्रमात मराठी भाषा ही सक्तीची केली पाहिजे. कोणत्याही माध्यमाची शाळा असो मराठी भाषा ही सक्तीची हवी. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी प्रयत्न होत आहेत. ही चांगली बाब आहे असे विचार त्यांनी मांडले.
या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नितीन देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. कढणे मॅडम यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रा. एच. एम. काकडे, प्रा. डॉ. बी. टी. शेणकर, प्रा. जे. डी. आरोटे तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी सहभागी झाले होते.

कार्याध्यक्ष : **प्रो. डॉ. द. के. गंधारे**
**प्रो. डॉ. आर. डी. ननावरे**

## जल, वनराई व गडकिल्ले संरक्षण व संवर्धन विभाग

१) महाराष्ट्र शासन व युनिसेफचा सहकार्याने नैसर्गिक संसाधनांचे, गडकिल्यांचे संरक्षण व संवर्धनासाठी महाविद्यालयात एप्रिल २०२३ रोजी चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचा राजूरमधील सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या व आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.
२) दि.९ व १० मे २०२३ रोजी पुणे येथे नैसर्गिक संसाधने व गडकिल्ले संरक्षण व संवर्धन कार्यशाळेत आपल्या महाविद्यालयाचे प्रा. उमेश अवसरकर यांनी सहभाग घेतला.

कार्याध्यक्ष :
**प्रा. व्ही. बी. येलमामे**
**प्रा. उमेश अवसरकर**

## आजीवन अध्ययन व विस्तार केंद्र विभाग

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे आजीवन अध्ययन व विस्तार केंद्र तसेच ॲड्. एम. एन.देशमुख महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने दि.१९ जानेवारी २०२३ रोजी आदिवासी समाजबांधवासाठी एक दिवसीय आरोग्य साक्षरता शिबिराचे आयोजन आपल्या महाविद्यालयात करण्यात आले.

कार्याध्यक्ष :
**प्रा. डॉ. एल. बी. काकडे**

## निवडणूक साक्षरता मंडळ

१) दि.२५ जानेवारी २०२३ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना मतदानाबाबत जागृतीपर शपथ देण्यात आली. व मतदार नोंदणी व जागृती संदर्भात प्रा. बबन पवार यांनी व्याख्यान दिले.
२) वर्षभर महाविद्यालयाचे विद्यार्थी व राजूर ग्रामस्थांचे मतदान नोंदणी फॉर्म वरून घेऊन मोठ्या प्रमाणात मतदार नोंदणी करण्यात आली.

कार्याध्यक्ष :
**प्रा. डॉ. आर. आर.सोनवणे**

# वैयक्तिक अहवाल

**प्रा. डॉ. द. के. गंधारे**

मराठी विभाग प्रमुख

संशोधन पेपर :

१) तीन मुलांचे चार दिवस – म.सा.पत्रिका, पुणे जून –२९२२

* ग्रंथांतर्गत संशोधन पेपर :

१) अर्वाचीन मराठी वाङ्मय स्वरूप वा वाटचाल या ग्रंथात नाट्यवाङ्मय स्वरूप व वाटचाल हा शोधनिबंध प्रकाशित–१५ ऑक्टोबर २०२२

विषयतज्ज्ञ

१) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,सोनई–दि ६ जानेवारी २०२२

२) संगमनेर महाविद्यालय, संगमनेर येथिल मराठी संशोधन केंद्रातील श्री. माताडे विकास या विद्यार्थ्याला एम.फिल.पदवी प्रदान – दि.१६–११–२०२२

३) संगमनेर महाविद्यालय, संगमनेर येथे मराठी पीएच. डी मुलाखतीसाठी विषयतज्ज्ञ – दि.२३–०८–२०२२

४) संगमनेर महाविद्यालय, संगमनेर येथे मराठी पीएच. डी मुलाखतीसाठी विषयतज्ज्ञ – दि. ३–१२–२०२२

५) अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर येथे मराठी विषयाच्या पीएच. डी.विद्यार्थ्यांच्या मुलाखतीसाठी कुलगुरू नियुक्त प्रतिनिधी दि.०१–०२–२०२३

**व्याख्यान :**

१) कोपरगाव महाविद्यालय, कोपरगाव येथे क्रांतीज्योती सावित्राबाई फुले जयंती निमित्त व्याख्यान – दि. जानेवारी २०२३

२) रा.से.यो. विशेष हिवाळी शिबार–देवगाव – ६ जानेवारी २०२३

**अभ्यासेतर :**

१) वाङ्मय मंडळ प्रमुख

**चर्चासत्र :**

१) बेलापूर महाविद्यालय, बेलापूर राष्ट्रीय चर्चासत्रात शोधनिबंध वाचन – दि. १० एप्रिल २०२३

**प्रा. डॉ. काकडे एल. बी.**

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२३ अहमदनगर येथे २२ फेब्रुवारी रोजी सक्रीय सहभाग

२) करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत उद्योजक संसद व मॉडेल स्कील डेव्हलपमेंट सेंटर कार्यशाळा दि.१० मार्च २०२३ रोजी मॉडर्न कॉलेज ऑफ पुणे या ठिकाणी उपस्थिती

३) राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रिय संचनालय, भारत सरकार यांच्या वतीने औपचारिक शिक्षण किंवा नियमित नोकरीत नसलेल्या युवकांचा सर्वेक्षण उपक्रम प्रशिक्षण कार्यशाळा सहभाग दि.१२ एप्रिल २०२३

## ॲड्. मनोहरराव नानासाहेब देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजूर

**प्रा. डॉ. आर. आर सोनवणे**

१) युजीसी केअर क्रूप – १ जरनल मधे तीन शोध निबंध प्रसिध्द.

२) ग्लोबल बेस्ट रिसर्च अवार्ड – २०२२

**सहभाग :**

१) यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई येथे Histry of Indian Freedom Movement राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग दि. ४/१०/२०२२

२) राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे झालेल्या आखिल महाराष्ट्र इतिहास परिषद ३० वे अधिवेशनात सहभाग व शोधनिबंधाचे वाचन दि.९/१२/२२ ते १०/१२/२०२२

३) आर्ट,सायन्स व कॉमर्स कॉलेज सोनई येथे Implementation of National Education Policy 2020 Multi Disciplinary Education झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग – दि. २४/२/२३ ते २५/२/२३

४) International Conference on Changing Prospective in Invironment, Managment, Humanities, Sciences and Technology या विषयावर आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज, सोनई येथे झालेल्या आंतराष्ट्रीय परिषदेत सहभाग व शोधनिबंधाचे वाचन १४/७/२०२२ ते ५/७/२२

**प्रा. पवार बी. एम.**

१) ऑनलाईन बुक पब्लिकेशन : शीर्षक – राजूरमधील मुस्लिमांचा राजकीय विकास

२) संगमनेर महाविद्यालय, संगमनेर येथे दि. ४ ऑगस्ट २०२२ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या हर घर तिरंगा उपक्रमात

**सहभाग :**

३) जनसेवा फाऊंडेशन संचालित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शेंडी येथे २८ फेब्रुवारी २०२३ रोजी लोकशाही जनजागृती या विषयावर व्याख्यान

४) एस. एम. बी. एस. टी. महाविद्यालय, संगमनेर येथे दि. २३ जून २०२२ व दि. ७ सप्टेंबर २०२२ रोजी यूजी/पीजी, अनुदानित/विनाअनुदानित सहाय्यक प्राध्यापक पदांच्या मुलाखती घेण्यासाठी विषयतज्ज्ञ म्हणून उपस्थित.

**प्रा. डॉ. पी. टी. करंडे**

१) महाविद्यालय देवगाव येथे पार पडलेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीरात दि.७ जाने.२०२३ रोजी पर्यटन एक रोजगार या विषयावर व्याख्यान दिले

२) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड येथे २४ ते २६ डिसे.२०२२ संशोधनपत्राचे वाचन केले.

३) अहमदनगर आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग घेऊन संशोधनपत्राचे वाचन केले.

४) आंतरराष्ट्रीय संशोधन पुस्तकात संशोधनपत्र प्रसिध्द झाले.

**प्रा.डॉ.बी.टी.शेणकर** (हिन्दी विभाग प्रमुख)

१) अगस्ती कला,वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय,अकोले येथे हिंदी विषयाच्या स्थानिक निवड समिती करीता विषय तज्ज्ञ म्हणून उपस्थित (दिनांक -२०/०८/२०२२)

२) दि.५ फेब्रुवारी २०२३ रोजी संगमनेर महाविद्यालयाच्या अनुसंधान विभागाने अअअ या विषयावरील आयोजित केलेल्या कार्यशाळेत उपस्थिती.

३) के.टी.एच.एम.महाविद्यालय, नाशिक येथील हिंदी अनुसंघान केंद्रात पी.एच.डी.अस्थायी विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी विषय तज्ज्ञ म्हणून उपस्थित दिनांक १७/०९/२०२२

४) दिनांक ११/११/२०२२ रोजी महाविद्यालयाच्या कला शाखा प्रमुख पदी नियुक्ती.

५) कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,शेंडी भंडारदरा येथे हिंदी विभागाने आयोजित केलेल्या हिंदी दिवस समारोह कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक व अतिथी उपस्थित (दिनांक १५/०९/२०२२)

६) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मित व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या हिंदी विषयाच्या निवड समिती वर सदस्य म्हणून नियुक्ती (दिनांक १४/११/२०२२)

७) १० दि.५/०१/२०२३ रोजी देवगांव ता.अकोले येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबीरात संत साहित्याची प्रासंगिकता या विषयावर व्याख्यान दिले.

८) १३ भाषा सहोदरी, नवी दिल्ली यांनी मॉरिशस येथे आयोजित केलेल्या नवव्या आंतरराष्ट्रीय अधिवेशनात सहभाग व प्रवासी साहित्यकारों का हिन्दी के अन्तराष्ट्रियकरण में योगदान या विषयावर शोधपत्रा चे वाचन (१०/०१/२०२३)

९) १४ विश्व हिंदी साहित्य सेवा संस्थान प्रयागराज, उत्तर प्रदेश व न्यू आर्ट्स कॉमर्स एंड साइन्स महाविद्यालय अहमदनगर येथे आयोजित द्वि दिवसीय अधिवेशनात सहभाग व क्रांतदर्शी संत तुकाराम के काव्य की प्रासंगिकता या विषयावरील शोध निबंधा चे वाचन (दिनांक २४/०९/२०२२)

ब) राष्ट्रीय सेवा संस्थान,पुणे महाराष्ट्र यांचे तर्फे राष्ट्रीय साहित्य सेवा सम्मान प्राप्त (१९/०६/२०२२)

क) भाषा सहोदरी, नवी दिल्ली यांचे तर्फे मॉरिशस येथे आयोजित केलेल्या आंतराष्ट्रीय अधिवेशनात सहोदरी रत्न, सम्मान प्राप्त (१०/०१/२०२३)

# विज्ञान विभाग शोधनिबंध

महाविद्यालयातील विज्ञान विभागातील प्राध्यापकांनी Scolar Reserch Journal for Interdisciplinary Students या ISSN Peer Review Journal जाने./फेब्रु. २०२३, Vol. 11, Issue 62 चे संपादन केले.

संपादक मंडळ : संपादक : प्रा. डॉ. बी. के. टपळे, संपादक सदस्य : प्रा.डॉ.वाल्मिक गिते, प्रा.सुखदेव थोरात, प्रा.डॉ.दिपमाला तांबे, प्रा.रोहित मुठे सदर संशोधनपरिषद खालील प्राध्यापकांची संशोधन पत्रे प्रसिध्द झाली.

| प्राध्यपकाचे नाव | संशोधनपत्र संख्या | प्राध्यपकाचे नाव | संशोधनपत्र संख्या |
|---|---|---|---|
| १) प्रा.डॉ.गिते व्ही.एन. | -५ | ८) प्रा.मुठे आर.सी. | -२ |
| २) प्रा.साळुंखे एम.एस. | -४ | ९) प्रा.हांडे एस.वाय. | -७ |
| ३) प्रा.कडलग एस.डी. | -२ | १०) प्रा.शिंदे एस.आर. | -६ |
| ४) प्रा.डॉ.टपळे बी.के. | -१ | ११) प्रा.अवसरकर यू.डी. | -२ |
| ५) प्रा.थोरात एस.के. | -४ | १२) प्रा.धिंदळे सुलोचना | -१ |
| ६) प्रा.डॉ.शिंदे एम.बी. | -१ | १३) प्रा.राजेंद्र कासार | -३ |
| ७) प्रा.डॉ.तांबे डी. बी. | -३ | १४) प्रा.सचिन भोसले | -३ |

## ॲड्. मनोहरराव नानासाहेब देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजूर

### प्रा. डॉ. एम. बी. शिंदे (अर्थशास्त्र विभाग)

१) दि. २८/०८/२०२२ ते ४/०९/२०२२ या कालावधीत अकोले एज्यूकेशन सोसायटीचे एम.बी.ए. व एम.सी.ए. कॉलेज येथे बहि:स्थ परीक्षक म्हणून काम पाहिले.

२) १६ जानेवारी ते २८ जानेवारी २०२३ या कालावधीत २१ व्या शतकातील भारतीय शिक्षण क्षेत्रापुढील आव्हाने या विषयावर दोन आठवड्याचा ऑनलाईन रिफ्रेशर कोर्स पूर्ण केला.

३) दि. १० व ११ फेब्रुवारी २०२३ रोजी ॲड्. एम. एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजूर येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय कार्यशाळेत " The Impact of climate change on Agriculture" या विषयावर संशोधन पेपर सादर.

४) दि.१३ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०२३ दरम्यान शेंडी कॉलेज येथे बहि:स्थ परीक्षक म्हणून काम पाहिले.

५) दि. १४/०४/२०२३ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती निमित्त महानायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर व्याख्यान दिले.

### प्रा. डॉ. बी. के. टपळे

१) भारत सरकारचे पेटंट कार्यालयाकडून दोन पेटंट प्रसिध्द

१) Smart Honey Comb with Monitoring. २) Smart Fishing Apparatus

२) आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत शोध निंबधाचे वाचन

३) आंतरराष्ट्रीय जरनल Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies चे संपादकपदी निवड

४) महाविद्यालयातील IQAC चे समन्वयक

५) महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्यपदी निवड

६) सा.फु.पुणे विद्यापीठ प्राणिशास्त्र विषयात एम.फील. आणि पीएच. डी. चे मार्गदर्शक म्हणून मान्यता

७) आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये शोधनिबंधाचे प्रकाशन

८) पुरस्कार : दि. १४ आणि १५ जुलै २०२२ मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेमध्ये Global Lifetime Achievement Award ने सन्मानित करण्यात आले.

### प्रा. एस. के. थोरात

१) कला व सांस्कृतिक संचनालय, गोवा सरकार व कला पर्यटन व सांस्कृतिक महोत्सव समिती, सिंधूदुर्ग, महाराष्ट्र यांचा राष्ट्रीय शैक्षणिक सेवारत्न सन्मान पुरस्कार

२) आदिवासी कृती समिती, महाराष्ट्र पुणे यांचा आदर्श शिक्षक सन्मान पुरस्कार

३) पेटंट भारत सरकार Robot for cleaning solar panels

४) पुस्तके प्रकाशन १) Atomic Molecular Physics २) Fundamentals of Nanoscience

५) शोधनिबंध आंतरराष्ट्रीय जरनल मध्ये ०४ शोधनिबंध प्रकाशित

६) Workshop 'chi test' वर दि. २३/०७/२०२२ रोजी Research Foundation V.V. Academy मध्ये सहभाग

७) Research Foundation V.V. Academy यांचा दि. २०/०९/२२ ते २०/०१/२२ या कालावधीतल 'Research Methodology' Workshop पूर्ण.

८) International Seminar - Sunrise University यांचा दि.१७ ऑक्टोबर २०२२ रोजी 'Research Methodology' या International Seminar मध्ये सहभाग

## अॅड्. मनोहरराव नानासाहेब देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजूर

**प्रा.साळुंके एम. एस.**

१) भारत सरकारचे पेटंट : Robot for cleaning solar panels

२) UGC Peer Review Journal ISSN मध्ये चार संशोधनपत्रे प्रसिध्द.

**प्रा. संजय धोंडिबा कडलग** (पदार्थ विज्ञान विभाग)

१) दि. १० ते ११ फेब्रुवारी २०२३ रोजी अॅड्.एम.एन.देशमुख महाविद्यालय राजूर येथे झालेल्या Biodivesity या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्र मध्ये खालील विषयावरील दोन शोध निबंधचे प्रकाशन

अ) To study the properties $CH_3N_2O_6$ doped with Tb phosphor

ब) Lee's method for investigation of thermal conductivity of woods.

T.Y. B.Sc. Physics (CBCS Pattern) अभ्यासक्रमासाठी खालील प्रमाणे चार पुस्तकांचे Success Publication मार्फत प्रकाशन

१) Renewvable Energy Sourses - I

२) Renewvable Energy Sourses - II

३) Solid State Physics

४) Mathematical Methods in Physics - II

**प्रा. आर. सी मुठे**

१) भारत सरकारकडून पेटंट मान्यता : संशोधन विषय Robot for cleaning solar panels

२) अहमदनगर येथे दहा दिवसीय राष्ट्रीय छात्र सेना शिबिरात सहभाग दि.२१ ते २९ जून २०२२

३) संगमनेर महाविद्यालय संगमनेर येथे सामाजिक न्याय संधी कार्यशाळा सहभाग : दि. ६ ऑक्टोबर २०२२

४) मिझोराम विद्यापीठात शॉर्ट टर्म कोर्स पूर्ण केले. दि. २० ते २७ जानेवारी २०२३

५) UGC Peer Review Journal ISSN मध्ये तीन शोधनिबंध प्रकाशित

**प्रा. डॉ. डी. बी. तांबे** (वनस्पतीशास्त्र विभाग)

भारतसरकार

१) पेटंट प्रकाशन : रजिस्टेशन ऑफ डिझाईन 'Storage device to preserve and transport plant species.'

२) Best Researcher Award - 2022

International Conference on changing (Perspectives in environment Managment Humanities, Science & Technology) Organised by Yuvraj College, Mysore (Karnatka)

३) आर्टस, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, सोनई आणि उमा कॉलेज, पंढरपूर येथे आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग आणि शोध निबंधाचे वाचन

**प्रा. येलमामे व्ही. बी.**

१) सनराईज युनिर्व्हसिटी अल्वर (राजस्थान) येथे डिसेंबर २०२२ मध्ये पीएच. डी. कोर्स वर्क पूर्ण केले.

## दरवर्षी दिली जाणारी रोख पारितोषिके

### सन :- २०२२ - २३

| विद्यार्थ्यांचे नाव | पारितोषिक |
|---|---|
| १) कु.भांडकोळी अनिता नामदेव | • कै. का.शं.केळकर यांच्या स्मरणार्थ श्रीमती वत्सला केळकर यांनी ठेवलेल्या कायम ठेवीतून तृतीय कला या वर्गात हिंदी विषय स्पेशल घेऊन गुणानुक्रमे प्रथम<br>• कै.मोहन वसंत बोऱ्हाडे (पप्पू) यांच्या स्मरणार्थ श्री.वसंत रंगनाथ बोऱ्हाडे राजूर यांनी ठेवलेल्या कायम ठेवीच्या व्याजातून तृतीय वर्ष कला या वर्गात हिंदी विषय स्पेशल घेऊन गुणानुक्रमे प्रथम |
| २) गुडनर अमोल प्रकाश | • कै.श्री.सी.गं.माजी अध्यक्ष,सत्यनिकेतन संस्था पुणे यांनी ठेवलेल्या कायम ठेवीच्या व्याजातून तृतीय वर्ष विज्ञान गुणानुक्रमे प्रथम<br>• माडर्न सायंटिफिक कंपनी, संगमनेर तर्फे श्री. बी.एन. दिघे यांनी ठेवलेल्या कायम ठेवीच्या व्याजातून तृतीय वर्ष विज्ञान रसायनशास्त्र विषयात गुणानुक्रमे प्रथम<br>• महाविद्यालयने चालविलेल्या वसतिगृहात राहाणाऱ्या तृतीय वर्ष कला/विज्ञान/वाणिज्य शाखेत गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस रक्कम रु. १००० रोख पारितोषिक<br>• कै.मधुकरराव भगवंतराव देशमुख यांच्या स्मरणार्थ कार्यालय अधीक्षक श्री.आर.एम.देशमुख यांनी ठेवलेल्या कायम ठेवीच्या व्याजातून कमवा व शिका योजनेत सहभाग घेऊन कोणत्याही शाखेत गुणानुक्रमे प्रथम |
| ३) थिगळे ज्ञानेश्वर किसन | • सौ. समता ज्ञानेश्वर काकडे यांनी त्यांचे वडील कै. कॉम्रेड मुरलीधर नवले यांच्या स्मरणार्थ ठेवलेल्या कायम ठेवीच्या व्याजातून तृतीय वर्ष कला या वर्गात राज्यशास्त्र विषय स्पेशल घेऊन गुणानुक्रमे प्रथम |
| ४) कु. गवारी कांचन अशोक | • कै. उत्तम कारभारी गाडेकर यांच्या स्मरणार्थ प्रा. भास्कर रंगनाथ होले यांनी ठेवलेल्या कायम ठेवीच्या व्याजातून तृतीय वर्ष कला या वर्गात इंग्रजी विषय स्पेशल घेऊन गुणानुक्रमे प्रथम |

## दरवर्षी दिली जाणारी रोख पारितोषिके

### सन :- २०२२ - २३

| विद्यार्थ्यांचे नाव | पारितोषिक |
|---|---|
| **५) सुकटे दत्तात्रय अशोक** | • ॲड्. मनोहरराव देशमुख यांच्या मातोश्री कै. अुसया नानासाहेब देशमुख यांच्या स्मरणार्थ कायम ठेवीच्या व्याजातून तृतीय वर्ष कला या वर्गात गुणानुक्रमे प्रथम<br>• कै.राधूजी शंकर पवार गुरुजी व परिवार, राजूर यांनी ठेवलेल्या कायम ठेवीच्या व्याजातून तृतीय वर्ष कला या वर्गात गुणानुक्रमे प्रथम<br>• कै.कांतीलाल लक्ष्मण जोशी (कडेकर) यांचे स्मरणार्थ श्री. दिगंबर कालिदास जोशी, पुणे यांनी ठेवलेल्या यांनी ठेवलेल्या कायम ठेवीच्या व्याजातून तृतीय वर्ष कला या वर्गात अर्थशास्त्र विषय स्पेशल घेऊन गुणानुक्रमे प्रथम<br>• तृतीय वर्ष कला या वर्गात गुणानुक्रमे प्रथम |
| **६) पोटे अजय जगन** | • कै. प्रा. सी. एन. बिडवे यांच्या स्मरणार्थ श्रीमती शारदा चंद्रकांत बिडवे यांनी ठेवलेल्या कायम ठेवीच्या व्याजातून तृतीय वर्ष विज्ञान या वर्गात वनस्तीशास्त्र विषय स्पेशल घेऊन गुणानुक्रमे प्रथम<br>• मार्च/एप्रिल २००८ पासून मा. डॉ. सौ. नीलम पाटील, बारामती यांचे तर्फे तृतीय वर्ष विज्ञान या वर्गात वनस्तीशास्त्र विषय स्पेशल घेऊन गुणानुक्रमे प्रथम |
| **७) कु. साबळे सुवर्णा विकास** | • कै. सौ. ज्योती लक्ष्मण वाळे यांच्या स्मरणार्थ प्रा. लक्ष्मण लहानू वाळे यांचेकडून तृतीय वर्ष विज्ञान या वर्गात वनस्तीशास्त्र विषय स्पेशल घेऊन गुणानुक्रमे प्रथम आलेल्या विद्यार्थिनीस रोख पारितोषिक |

## राष्ट्रीय सेवा योजना

| विद्यार्थ्यांचे नाव | सहभाग |
|---|---|
| **डगळे तुषार माधव** | • आण्णासाहेब मगर महाविद्यालय, पुणे आयोजित रा.से.यो. च्या रायरेश्वर व केंजळगड दुर्ग संवर्धन आणि स्वच्छता शिबिरात सहभाग.<br>• डॉ.डी.वाय पाटील महाविद्यालय, आकुर्डी पुणे आयोजित केलेल्या रतनगड राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक आदान-प्रदान गिर्यारोहण शिबिरात सहभाग.<br>• न्यू आर्टस कॉलेज, अहमदनगर आयोजित एस.आर.डी. जिल्हास्तरीय निवड चाचणी शिबिरात सहभाग. |
| **कु.पोखरकर शीतल धनंजय** | • न्यू आर्टस कॉलेज, अहमदनगर आयोजित एस.आर.डी. जिल्हास्तरीय निवड चाचणी शिबिरात सहभाग.<br>• प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित अमृत महोत्सव रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक. |
| **गभाले अविनाश संतोष** | • समर्थ ग्रुप ऑफ इन्सिट्युशन्स कॉलेज ऑफ इंजिनिरींग बेल्हे, पुणे आयोजित "वैभवशाली जुन्नरचे पर्यटन" विषयावरील रा.से.यो.च्या विद्यापीठस्तरीय शिबिरात सहभाग |
| **यादव शुभम चंद्रभान** | • समर्थ ग्रुप ऑफ इन्सिट्युशन्स कॉलेज ऑफ इंजिनिरींग बेल्हे, पुणे आयोजित "वैभवशाली जुन्नरचे पर्यटन" विषयावरील रा.से.यो.च्या विद्यापीठस्तरीय शिबिरात सहभाग |
| **इदे निखील यादव** | • समर्थ ग्रुप ऑफ इन्सिट्युशन्स कॉलेज ऑफ इंजिनिरींग बेल्हे, पुणे आयोजित "वैभवशाली जुन्नरचे पर्यटन" विषयावरील रा.से.यो.च्या विद्यापीठस्तरीय शिबिरात सहभाग |
| **पिचड सचिन पांडुरंग** | • डॉ.डी.वाय पाटील महाविद्यालय, आकुर्डी पुणे आयोजित केलेल्या रतनगड राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक आदान-प्रदान गिर्यारोहण शिबिरात सहभाग. |
| **तारगे राम बाळू** | • डॉ.डी.वाय पाटील महाविद्यालय, आकुर्डी पुणे आयोजित केलेल्या रतनगड राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक आदान-प्रदान गिर्यारोहण शिबिरात सहभाग. |
| **मुठे अमित संजय** | • डॉ.डी.वाय पाटील महाविद्यालय, आकुर्डी पुणे आयोजित केलेल्या रतनगड राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक आदान-प्रदान गिर्यारोहण शिबिरात सहभाग. |

## आविष्कार संशोधन प्रकल्प

| विद्यार्थ्यांचे नाव | सहभाग |
|---|---|
| कु. हेकरे पूजा किरण | • महाविद्यालयांतर्गत पदव्युत्तर स्तरावर आयोजित अविष्कार संशोधन स्पर्धेत प्रथम क्रमांक.<br>• संबंधीत प्रकल्पाचा विभागीय स्तरावर सहभाग |
| चावडे ओंकार निवृत्ती | • महाविद्यालयांतर्गत पदवी स्तरावर आयोजित अविष्कार संशोधन स्पर्धेत प्रथम क्रमांक. |
| चावडे ओंकार निवृत्ती | • महाविद्यालयांतर्गत पदवी स्तरावर आयोजित अविष्कार संशोधन स्पर्धेत प्रथम क्रमांक. |

## विज्ञान मंडळ ( Science Association )

| | |
|---|---|
| कु. डावरे अस्मिता मच्छिंद्र | • महाविद्यालयांतर्गत पदव्युत्तर स्तरावर आयोजित 'Science Quiz' स्पर्धेत प्रथम क्रमांक. |
| कु. वाकळे ज्योती रंजन | • महाविद्यालयांतर्गत आयोजित निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक. |
| कु. साबळे ऋतुजा देवराम | • महाविद्यालयांतर्गत आयोजित भित्तीचित्र स्पर्धेत प्रथम क्रमांक. |

## कॉमर्स फेस्टिवल

| | |
|---|---|
| कु. शेंगाळ अनुराधा संजय | • महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागांतर्गत आयोजित वैयक्तिक नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक. |
| कु. मुठे अश्विनी बाळू | • महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागांतर्गत आयोजित कविता वाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक. |
| चौधरी रोहीत अंकुश | • महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागांतर्गत आयोजित संगीत खुर्ची स्पर्धेत प्रथम क्रमांक. |
| कु. आरोटे विशाखा अशोक | • महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागांतर्गत आयोजित संगीत खुर्ची स्पर्धेत प्रथम क्रमांक. |
| तळपाडे तुषार भास्कर | • महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागांतर्गत आयोजित वैयक्तिक गीतगायन स्पर्धेत प्रथम क्रमांक. |
| कु. गवारी अश्विनी सोमनाथ | • महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागांतर्गत आयोजित 'Best Writing' स्पर्धेत प्रथम क्रमांक. |

## विद्यार्थिनी मंच

| विद्यार्थ्यांचे नाव | सहभाग |
|---|---|
| **कु. उघडे श्रुतिका यशवंत**<br>**कु. पाबळकर अक्षदा शामकांत** | • महाविद्यालयाचा विद्यार्थिनी मंच आयोजित पाककला स्पर्धेत प्रथम क्रमांक विभागून |
| **कु. भडांगे निकिता दिलीप**<br>**कु. मधुरकर संतोषी शांताराम**<br>**कु. चौधरी रोहिणी काळू** | • महाविद्यालयाचा विद्यार्थिनी मंच आयोजित मेहंदी स्पर्धेत प्रथम क्रमांक विभागून |
| **कु. गोरे ममता मधुकर**<br>**कु. सोनवणे मानसी किरण**<br>**कु. गोडसे ज्ञानेश्वरी सुधीर** | • महाविद्यालयाचा विद्यार्थिनी मंच आयोजित निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक विभागून |

## शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये गुणानुक्रमे प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण विद्यार्थी

| विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग |
|---|---|
| १) देशमुख अक्षदा वाळू | प्रथम वर्ष कला |
| २) लहामगे पायल काशिनाथ | द्वितीय वर्ष कला(अर्थशास्त्र) |
| ३) सुरनर रोहिदास लक्ष्मण | प्रथम वर्ष विज्ञान |
| ४) सोनवणे मानसी किरण | द्वितीय वर्ष विज्ञान |
| ५) हंगेकर वेदिका बाळकृष्ण | प्रथम वर्ष वाणिज्य |
| ६) भालेराव श्रध्दा विलास | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| ७) मोहटे ओंकार आत्माराम | तृतीय वर्ष वाणिज्य |
| ८) खाडे भास्कर विठ्ठल | एम.ए-भाग-१ |
| ११) येलमामे मोनिका कैलास | एम.ए.भाग-२ |
| १२) शेळके अशोक विनायक | एम.कॉम.-भाग -१ |
| १३) वाळकोळी संकेत भगवान | एम.कॉम.-भाग -२ |
| १४) तळेकर रेणूका बाळासाहेब | एम.एस्सी(वनस्पतीशास्त्र) |
| १५) सोलापुरे प्राजक्ता शालेम | एम.एस्सी(वनस्पतीशास्त्र) |
| १६) बिडवे सौरभ संजय | एम.एस्सी.(रसायनशास्त्र) |
| १७) काळे प्रतिक दत्तात्रय | एम.एस्सी.(रसायनशास्त्र) |

# • महाविद्यलयास मान्यवरांच्या भेटी •

१) **मा.एल.डी.शिंदे, लेखाधिकारी,** उच्च शिक्षण (अनुदान) पुणे विभाग

२) **मा.प्रा.एस.झेड. देशमुख,** सनदी लेखापाल,संगमनेर

३) **प्रा.डॉ.एस.पी.लवांडे,** अध्यक्ष,एम.फक्टो, महाराष्ट्र

४) **प्रा.बाबा खरात,** सामाजिक कार्यकर्ते, संगमनेर

५) **प्रा.डॉ.विजय भगत,** भूगोल विभागप्रमुख,अगस्ती महाविद्यालय, अकोले

६) **मा.स्मिता गुणे,** सामाजिक कार्यकर्त्या,संगमनेर

७) **मा.ममताताई भांगरे,** अन्नमाता, देवगाव, ता.अकोले

८) **प्राचार्य डॉ.इंद्रजीत जाधव,** बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव, जि. पुणे

९) **मा.प्रा.एस.एस. परदेशी,** के.पी.जी. कॉलेज,इगतपुरी

१०) **मा.प्रशांत डगळे,** आय.पी.एस. -२०२२

११) **मा.डी.एम.भांडकोळी,** माजी पोलीस अधिकारी

१२) **मा.डॉ.प्रा.आर.एन.भारमल,** माजी संचालक वैद्यकीय शिक्षण

१३) **मा.प्रा.विनय एम. रावले,** महाराजा सयाजीराव विद्यापीठ, वडोदरा

१४) **मा.डॉ.किशोर राजपूत,** युनिव्हर्सिटी ऑफ बरोडा

१५) **मा.डॉ.जी.एस.घाणे,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१६) **मा.डॉ.बाळासाहेब आघाव,** चांगु काना ठाकूर कॉलेज, न्यू पनवेल

१७) **मा.डॉ.चंद्रशेखर हिवरे,** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

१८) **मा.डॉ.विजय कानवडे,** युनिव्हर्सिटी ऑफ हैद्राबाद

१९) **मा.डॉ.नागेश टेकाळे,** प्रसिडेंट, एनजीओ, मुंबई

२०) **मा.प्रा.डॉ.आर.जी. रसाळ,** पी.व्ही.पी. कॉलेज, प्रवरानगर

२१) **मा.सौ.प्रज्ञा देखणे,** टाटा समाजविज्ञान संस्था, मुंबई

२२) **मा.सुभाष मिंडे,** कराटे प्रशिक्षक, अकोले

# सावित्राबाई फुले पुणे विद्यापीठ गीत

## ज्ञान बनो कर्मशील,कर्म ज्ञानवान

पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर
लाख लाख कंठातुनि हाच एक सूर
करूणेच्या चरणांशी नत हो विज्ञान

माणुसकी धर्माचा अर्थ जाणतों
श्रमनिष्ठा हें पवित्र तीर्थ मानतों
हृदयातुनि समतेचा निर्भय अभिमान

सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
न्यायासव जागृति ही सत्वपरीक्षा
हें विश्वचि घर अमुचे मंत्र हा महान

– मंगेश पाडगांवकर

# ।। पसायदान।।

आतां विश्वात्मके देवे । येणें वाग्यज्ञें तोषावें।

तोषिनि मज द्यावें। पसायदान हें ।।१।।

जे खळांची व्यंकटी सांडो। तयां सत्कर्मी रती वाढो।

भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें।।२।।

दुरिताचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्ये पाहो।

जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात।।३।।

वर्षत सकळमंगळी। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी।

अनवरत भूमंडळी। भेटतु भूतां।।४।।

चलां कल्पतरुंचे आरव। चेतना चिंतामणीचें गांव।

बोलते जे अर्णव । पीयुषाचे।।५।।

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन।

ते सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु।।६।।

किंबहुना सर्वसुखी। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं।

भजिजो आदिपुरूखीं। अखंडित।।७।।

आणि ग्रंथोपजीवियें । विशेषीं लोकीं इयें।

दृष्टादृष्ट विजयें । हो आवें जी ।।८।।

तेथ म्हणजे श्रीविश्वेशरावो। हा होईल दानपसावो।

येणें वरे ज्ञानदेवो। सुखिया झाला।।९।।